अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक १७७ । शुक्रवार १० एप्रिल २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 । www.rashtrasahyadri.com

## भारतवर्ष ही 'योगभूमी'



**'सहजयोग' भाग २२**

भारतवर्ष ही केवळ भूमी नसून एक 'योगभूमी' आहे, जिथे हजारो वर्षांपासून ऋषी-मुनींनी आत्म साक्षात्काराचे महान कार्य केले आहे. जगातील इतर भूमी 'भोगभूमी' असताना, भारताने मात्र अध्यात्माचा मार्ग निवडला. आदिशंकराचार्यांनी मांडलेले अद्वैत तत्त्वज्ञान असो किंवा महंमद पैगंबर, शिर्डीचे साईबाबा, गुरुनानक आणि राजा जनक यांसारख्या महापुरुषांची शिकवण; या सर्वांचा मूळ संदेश एकच आहे. तो म्हणजे, मनुष्याला प्रत्यक्ष आत्मसाक्षात्काराचा अनुभव येणे आवश्यक आहे. या चैतन्यमयी सत्याचा वारसा लाभलेली ही भूमी मानवाला ईश्वरी तत्त्वाकडे नेण्याचे सामर्थ्य राखते. म्हणूनच, या योगभूमीचे आध्यात्मिक महत्त्व अगाध आहे.

## महत्त्वाचे..

### एमपीएससी'त ४६१ पैकी ११२ पदावर 'महाज्योती'चा ठसा!

मुंबई : शिक्षणाच्या बळावर सामाजिक परिवर्तन घडविण्याची ताकद काय असते, याचा ठसा महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूरने पुन्हा एकदा उमटवला आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या २०२४ च्या विविध २० संवर्गातील ४६१ पदांसाठी घेण्यात आलेल्या मुख्य परीक्षेत 'महाज्योती'च्या तब्बल ११२ विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करत स्पर्धा परीक्षेच्या क्षेत्रात आपला ठसा उमटवला आहे. या निकालात सुमारे २५ टक्के यश मिळवत महाज्योतीने बहुजन समाजाच्या उन्नतीचा नवा इतिहास रचला आहे. राज्य शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत कार्यरत असलेली ही स्वायत्त संस्था गेल्या साडेपाच वर्षांपासून ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना दर्जेदार प्रशिक्षण, सक्षम मार्गदर्शन आणि आर्थिक सहाय्य देत आहे. या सातत्यपूर्ण आणि दूरदृष्टीपूर्ण प्रयत्नांचे भक्कम फलित एमपीएससी २०२४ च्या निकालातून स्पष्टपणे समोर आले आहे.

# आयटी कंपनीत महिला अत्याचार अन् धर्मांतराचे रॅकेट

## नाशिकमध्ये महिला अत्याचारांच्या प्रकरणांची हॅट्रिक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नाशिक :** गेल्या काही दिवसांपासून नाशिक शहरात लैंगिक शोषणाच्या घटनांमध्ये धक्कादायक वाढ झाली आहे. भोंदू कॅप्टन अशोक खरातनंतर लघुउद्योग कन्सल्टंटनेही शेकडो महिलांचे शोषण केल्याचे समोर आले. आता एका नामांकित मल्टिनॅशनल आयटी कंपनीतील असाच संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. कंपनीतील वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी महिला कर्मचाऱ्यांचे लैंगिक शोषण केल्याचे समोर आले असून, याप्रकरणी पोलिसांनी पाच आरोपींना अटक केली आहे. विशेष म्हणजे पीडित महिलांचे बळजबरी धर्मांतर केल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

नाशिकमध्ये काही दिवसांपूर्वी स्वयंघोषित ज्योतिषी अशोक खरात याने भविष्य सांगण्याच्या बहाण्याने महिलांचे लैंगिक शोषण केल्याचे उघड झाले होते. त्यानंतर रवींद्र एरंडे याने महिलांचे आक्षेपार्ह व्हिडिओ बनवून त्यांना धमकावल्याची घटना ताजी असतानाच, आता कॉर्पोरेट क्षेत्रातील हे तिसरे मोठे प्रकरण समोर आल्याने खळबळ उडाली आहे.

नाशिकमधील एका नामांकित आयटी कंपनीत काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांनी त्यांच्या वरिष्ठांविरुद्ध गंभीर आरोप केले आहेत. आरोपींनी नोकरीचे आमिष



दाखवून आणि नंतर 'माझ्यामुळेच तुला नोकरी मिळाली' असे उपकाराचे ओझे टाकून महिलांना जाळ्यात ओढले. पीडितेच्या तक्रारीनुसार, सुट्टीच्या दिवशी तिला एका रिसॉर्टवर नेऊन तिच्यावर अत्याचार करण्यात आला.

कामाच्या ठिकाणी महिलांच्या अवयवांकडे पाहून अश्लील हावभाव करणे आणि त्यांच्या धर्माबद्दल आक्षेपार्ह टिप्पणी करणे, असे प्रकार तिथे सुरू होते. केवळ महिलाच नव्हे, तर एका तरुण कर्मचाऱ्याला देखील धर्मांतरासाठी भाग पाडण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार तपासात समोर आला आहे. (पान ४ वर)

### तब्बल ९ गुन्हे दाखल; पाच जणांना बेड्या

या संवेदनशील प्रकरणात शहर पोलिसांनी अत्यंत गोपनीयता पाळत तपास केला. २५ मार्च रोजी देवळाली कॅम्प येथे पहिला गुन्हा दाखल झाल्यानंतर, २ आणि ३ एप्रिल रोजी मुंबई नाका पोलीस ठाण्यात आणखी ८ गुन्हे नोंदवण्यात आले. पोलिसांनी आतापर्यंत आसिफ अन्सारी, शफी शेख, शाहरुख कुरेशी, रझा मेमन आणि तौसिफ अत्तार या पाच संशयितांना अटक केली आहे. न्यायालयाने या आरोपींना १० एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.




नाशिकमध्ये पोलिसांनी उघडकीला आणलेलं आयटी कंपनीतील प्रकरण अतिशय गंभीर आहे, एखाद्या टेक्निकल कंपनीमधे अशाप्रकारे गोष्टी घडणं धक्कादायक आहे. या सगळ्याचा तपास सखोल केला जाईल.

– देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री तथा गृहमंत्री

## काँग्रेसची माघार... तरी सुनेत्रा पवार बिनविरोध नाहीच

### बारामती विधानसभा पोटनिवडणुकीसाठी २३ उमेदवार रिंगणात



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** राज्याचे लक्ष लागून राहिलेल्या बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत अखेर काँग्रेसने माघार घेतली आहे.काँग्रेसने सुनेत्रा पवार यांच्याविरोधात ॲड. आकाश मोरे यांना उमेदवारी दिली होती. पण आज अखेर ॲड. आकाश मोरे यांनी निवडणुकीत माघार घेतली आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पत्रकार परिषद घेऊन याबाबतची घोषणा केली होती. काँग्रेसच्या माघारीनंतर सुनेत्रा पवार यांच्यासमोरील आव्हान संपेल असे वाटत होते. पण तसे अजिबात झालेले नाही आहे. कारण अद्याप २३ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात ठाम आहेत. त्यामुळे बारामतीत मतदान होणार आहे, इतकं मात्र निश्चित आहे.

राष्ट्रवादीचे दिवंगत नेते आणि राज्याचे उप मुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे बारामती विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणुक लागली आहे. या पोटनिवडणुकीत सुनेत्रा पवार यांच्यासमोर काँग्रेस पक्षासह ५३ जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. काँग्रेसने सुनेत्रा पवार यांच्याविरोधात ॲड. आकाश मोरे यांना उमेदवारी दिली होती. पण आज अखेर ॲड. आकाश मोरे यांनी निवडणुकीत माघार घेतली आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पत्रकार परिषद घेऊन याबाबतची घोषणा केली होती. यासोबत गुरुवारी अर्ज माघारी घेण्याच्या शेवटच्या दिवशी ३० उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले आहेत.

पण राष्ट्रवादीचे नेते धनंजय मुंडे यांच्या पत्नी करूणा मुंडे यांनी 'स्वराज्य शक्ती सेना' या पक्षाच्या उमेदवार म्हणून अर्ज भरलेला,त्याच्यासोबत साताऱ्यातील अभिजित बिचुकले यांनी अपक्ष अर्ज दाखल केला होता.पण अर्ज माघारी घेण्याच्या शेवटच्या दिवशी या दोघांनी माघार घेतलेली नाही. त्यामुळे अद्याप २३ उमेदवार अजूनही निवडणुकीच्या रिंगणात ठाम आहेत.त्यामुळे आता बारामतीत मतदान अटळ आहे. त्यामुळे येत्या काळात बारामतीच्या या रणधुमाळीत कोण बाजी मारणार? याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

### पोटनिवडणुकीसाठी मतदान कधी?


उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारी २०२६ ला निधन झाले होते.त्यांच्या निधनामुळे बारामती विधानसभा मतदारसंघात रिक्त झालेल्या जागेवर पोटनिवडणूक होत आहे. बारामती विधानसभा निवडणुकीच्या पोटनिवडणुकीसाठी २३ एप्रिल २०२६ रोजी मतदान पार पडणार आहे. तर या पोटनिवडणुकीचा निकाल हा ४ मे २०२६ला जाहीर होणार आहे.

# राहुरीत भाजपशी पवारांची राष्ट्रवादी भिडणार!

## वंचितचे चोळके, अपक्ष खेवरे, लंबे यांच्यासह ७ उमेदवारांचे आव्हान

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** राहुरी विधानसभा पोटावडणुकीबाबत अखेर चित्र स्पष्ट झालं असून, बिनविरोध निवडणुकीच्या चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे. अखेरच्या दिवशी सात उमेदवार रिंगणात उतरल्याने ही लढत आता रंगतदार होणार, हे स्पष्ट झाले. राहुरी मतदारसंघात भाजपचे अक्षय कर्डीले, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)चे गोविंद मोकाटे, वंचित बहुजन आघाडीचे संतोष चोळके यांच्यासह अपक्ष उमेदवार रावसाहेब खेवरे, सूर्यभान लांबे, महेश हापसे आणि अथर्व म्हसे असे एकूण सात उमेदवार निवडणुकीच्या मैदानात उतरले




आहेत. त्यामुळे ही निवडणूक सरळ आणि एकतर्फी न होता बहुरंगी होणार आहे.

सुरुवातीला ही निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता वर्तवली जात होती. कारण राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार प्राजक्त तनपुरे यांनी अचानक माघार घेतली होती. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी तनपुरेंची भेट घेतल्यानंतर त्यांनी ६ एप्रिल रोजी उमेदवारी अर्ज न भरण्याचा निर्णय घेतला. या घडामोडीनंतर राजकीय वर्तुळात ही निवडणूक बिनविरोध होणार, अशी चर्चा रंगली होती. मात्र, शेवटच्या (पान ४ वर)



### पोटनिवडणूक रिंगणातील उमेदवार

- अक्षय कर्डिले (भाजपा)
- गोविंद मोकाटे (राष्ट्रवादी श. पा.)
- संतोष चोळके (वंचित ब. आ.)
- पै.रावसाहेब खेवरे (अपक्ष)
- अथर्व म्हसे (अपक्ष)
- सूर्यभान लांबे (अपक्ष)
- महेश हापसे (अपक्ष)

## 'ईडी'ची वरात कोयटेंच्या दारात!

### कॅप्टन खरातची समता पतसंस्थेत अफाट मनी लॉंड्रिग?

अशोक दुशिंग । राष्ट्र सह्याद्री



**शिर्डी :** बहुचर्चित कॅप्टन अशोक खरात मनी लॉंड्रिंग प्रकरणाचे लोण आता सहकारी बँकिंग क्षेत्रापर्यंत पोहोचल्याचे दिसत आहे. खरात याने आपला मोठा काळा पैसा ओमप्रकाश तथा काका कोयटे यांच्या मार्गदर्शनाखाली चालणाऱ्या 'समता नागरी सहकारी पतसंस्थेत' वळवल्याचा संशय तपास यंत्रणांना आहे. या पार्श्वभूमीवर, अंमलबजावणी संचालनालय (ईडी) कोणत्याही क्षणी या प्रकरणाची व्याप्ती वाढवून मोठी कारवाई करण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

नाशिक एसआयटी (एसआयटी) आणि शिर्डी पोलिसांनी केलेल्या प्राथमिक तपासात समता पतसंस्थेतील व्यवहारांबाबत काही गंभीर त्रुटी समोर आल्या आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार, खरात याच्याशी संबंधित सुमारे १०० खाती एकाच दिवशी उघडण्यात आली असून, त्या सर्व खात्यांना कॅप्टन खरातचाच मोबाईल नंबर लिंक असल्याची धक्कादायक बाब उघड झाली आहे. या प्रकरणी राहाता शाखा व्यवस्थापकावर गुन्हा दाखल करण्यात (पान ४ वर)

### चाकणकरांना नोटीस, कोयटेंचा फास आवळला

शिर्डी पोलीसांनी समता मधील रूपाली चाकणकर यांच्या सख्ख्या बहीण प्रतिभा गणेश चाकणकर रा.पुणे यांचे व मुलाचे नावे समता मधे ४ खाती असून दोन कोटी ६४ पेक्षा जास्त रक्कमाची उलाढाल या खात्यातून झाली आहे. समता मधे ६० खाते दारांचे नावाने१०० खाते आहेत यातील ४० खाते दारांना यापूर्वीच शिर्डी पोलीसांनी तपासणी केली असून त्यांचे जबाब नोंदवून घेण्यात आले आहे. आता रूपाली चाकणकर यांची बहीण प्रतिभा हिची सदर खात्याच्या उलाढाली बाबत पोलीस चौकशी करणार असल्याने या प्रकरणाचा कॅप्टन खरात व्हाया रुपाली चाकणकर व्हाया प्रतिभा यांचे मार्फत कोयटे यांचे पर्यंत धागेदोरे पोहचणार असून कोयटे यांचे गळ्याचा फास आणखी आवळला जाणार आहे.

## ३४ हजार कलावंतांना शासनाचा 'मदतीचा हात'

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** राज्यातील आर्थिक दृष्ट्या दुर्बळ कलावंतांची संख्या झपाट्याने वाढत आहे. सरकारच्या वतीने दरवर्षी देण्यात येणाऱ्या आर्थिक मदतीत यंदा कमालीची भर पडली आहे. वर्षभरात ३४ हजार कलावंतांना दरमहा पाच हजार रुपये प्रमाणे मदतीचा हात देण्यात आला आहे. विविध कलाकारांची मोठी परंपरा असलेल्या राज्यातील संगीत, नाटक, लोककला, चित्रकला, शिल्पकला आणि नृत्य क्षेत्रातील कलाकारांना ही मदत दिली जाते. सरकारने यंदा या मदतीवर सुमारे २०४ कोटी खर्च केले.

राज्यातील जेष्ठ आणि आर्थिक दृष्ट्या दुर्बळ साहित्यिक व कलाकरांना शासनाच्या वतीने आर्थिक मदत देण्याची योजना (१९५५) जुनी आहे. साहित्यिक व कलाकरांच्या अ, ब, क, ड श्रेणीनुसार ही मदत दिली जात होती. त्यावेळी आर्थिक मदत घेणारे कलाकार अतिशय कमी (६०) होते. आर्थिक अडचणीमुळे अनेक कलाकर हालाखीचे दिवस काढत असल्याचे आढळून आले होते.

**यंदा लोककलावंत मदतीवर सुमारे २०४ कोटी खर्च**

शासनाने २०२४ मध्ये या योजनेत सुधारणा केली. कलाकारांसाठी निश्चित करण्यात आलेली श्रेणी रद्द करण्यात आली. सरसकट सर्वच पात्र कलाकारांना आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला. दरमहा आर्थिक मदतीची रक्कम पाच हजार रुपये केली. श्रेणी रद्द केल्याने तसेच रक्कम (पान ४ वर)

## प्राचार्याकडून उकळली सात लाखांची खंडणी

### 'रील स्टार' महिला पोलिसासह तिघांवर गुन्हा दाखल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** गुन्हेगारांवर वचक बसवण्याची जबाबदारी ज्यांच्या खांद्यावर आहे, त्यांनीच चक्क खंडणीखोरीचा मार्ग पत्करल्याने पुणे पोलीस दलात मोठी खळबळ उडाली आहे. एका नामांकित संस्थेच्या महिला प्राचार्याला ब्लॅकमेल करून सात लाख रुपये उकळल्याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षकासह तीन पोलीस कर्मचाऱ्यांविरुद्ध बंडगार्डन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत ही कारवाई केली. अजित बडे, सोनाली हिंगे, सुदाम तायडे अशी संशयित आरोपींची नावे आहेत.




पोलीस उपनिरीक्षक अजित बडे हे सध्या सायबर पोलीस स्टेशन येथे कार्यरत आहेत. तर सोनाली हिंगे या पोलीस दामिनी मार्शल असून शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथे कार्यरत असून त्या प्रसिद्ध रील स्टार देखील आहेत. तसेच सुदाम तायडे यांची शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथे नेमणूक करण्यात आली आहे. पुण्यातील एका शैक्षणिक संस्थेच्या महिला प्राचार्याला या तिघांनी (पान ४ वर)

# संघर्षाचा 'डाव' अर्ध्यावर मोडला...

## एरंडोलीचा ढाण्या वाघ अन् बीडचे कर्तव्यदक्ष तहसीलदार काळाच्या पडद्याआड

**बीड :** खाजगी वाहनावर चालक म्हणून काम करणाऱ्या वडिलांच्या कष्टाचे चीज करत, शून्यातून विश्व निर्माण करणारा एक तरुण अधिकारी आज काळाच्या पडद्याआड गेला. बीड जिल्ह्यातील केज तालुक्याचे तहसीलदार राकेश अण्णासाहेब गिड्डे (वय ३१) यांचे अपघाती निधन झाले आणि केवळ त्यांचे गाव एरंडोलीच नव्हे, तर संपूर्ण मराठवाडा सुन्न झाला. नियतीचा हा घाला एका उमद्या नेतृत्वाचा शेवट करणारा ठरला आहे.

राकेश यांचा प्रवास सोपा नव्हता. वडील अण्णासाहेब गिड्डे खाजगी वाहनावर चालक म्हणून काम करायचे, तर घरी जेमतेम कोरडवाहू शेती. अशा परिस्थितीत शिक्षणाची जिद्द उराशी बाळगून राकेश यांनी पुण्यासारख्या शहरात राहून स्पर्धा परीक्षेचा



संघर्ष केला. २०१९ मध्ये त्यांची तहसीलदार पदी निवड झाली आणि एका कष्टकरी कुटुंबाचे भाग्य उजळले. ज्या वयात तरुण करिअरसाठी चाचपडत असतात, त्या वयात राकेश एका तालुक्याचा डोलारा सांभाळत होते.

कोरोना काळात स्वतः दूर असतानाही आपल्या गावांसाठी आणि कार्यक्षेत्रासाठी त्यांनी वैद्यकीय सुविधा व औषधांची मोठी मदत उभी केली होती.

### शेतकऱ्यांचा 'बांधावरचा' अधिकारी

बीड जिल्ह्यासारख्या आव्हानात्मक ठिकाणी काम करताना राकेश यांनी आपली वेगळी छाप पाडली होती. केवळ कार्यालयात न बसता, थेट 'बांधावर जाणारा तहसीलदार' अशी त्यांची ओळख निर्माण झाली होती. अडल्या-नडल्या सामान्य माणसांची कामे गतीने करण्यावर त्यांचा भर होता

राज्यातील हजारो तरुणांना ते स्पर्धा परीक्षेसाठी विनामूल्य मार्गदर्शन करत असत.

राकेश केवळ एक अधिकारी नव्हता, तर आमच्या गावातील शेकडो तरुणांसाठी चालती-बोलती प्रेरणा होता. त्याने गरिबी पाहिली (पान ४ वर)

## संपादकीय...

# महाविकास आघाडीची 'बिघाडी' आणि भाजपची खेळी!

महाराष्ट्राच्या राजकारणात २०१९ साली एका नव्या प्रयोगाचा जन्म झाला, तो म्हणजे 'महाविकास आघाडी'. भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी विसंगत विचारधारा असलेले शिवसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेस हे तीन पक्ष एकत्र आले. 'कधीही एकत्र येऊ शकणार नाहीत' असे मानले जाणारे हे पक्ष केवळ सत्तेसाठी नव्हे, तर भाजपच्या वाढत्या वर्चस्वाला लगाम घालण्यासाठी एका छताखाली आले होते. मात्र, काळाच्या ओघात या आघाडीची वीण उसवत गेली असून, आज ही आघाडी केवळ कागदावरच उरली आहे की काय, असा प्रश्न पडण्याइतपत परिस्थिती गंभीर झाली आहे. बारामती आणि राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीच्या निमित्ताने मविआतील अंतर्गत अविश्वास आणि विस्कळीतपणा चव्हाट्यावर आला असून, भाजपचा 'मविआ मुक्त महाराष्ट्र' हा डाव आता यशस्वी होताना दिसत आहे.

महाविकास आघाडीत फूट पडण्यामागे भाजपची 'फोडा आणि जोडा' ही नीती अत्यंत प्रभावी ठरली. शिवसेनेतील बंड आणि त्यानंतर राष्ट्रवादीतील उभी फूट, या दोन घटनांनी मविआचा कणाच मोडीत काढला. भाजपच्या या रणनीतीमुळे काँग्रेसलाही आपले अनेक बडे नेते गमवावे लागले. सत्तेत असताना जे पक्ष एकदिलाने लढत होते, त्यांच्यात आता एकमेकांकडे संशयाने पाहण्याची स्पर्धा लागली आहे. विशेषतः शरद पवार यांच्या पक्षाची बदलती भूमिका काँग्रेससाठी नेहमीच संशयास्पद राहिली आहे. राजकीय सोयीनुसार भूमिका घेण्याच्या पवारांच्या शैलीमुळे मविआतील विश्वासाला तडे गेले आहेत.

लोकसभा निवडणुकीत मविआने दिलेली झुंज प्रभावी वाटली असली, तरी विधानसभा निवडणुकीनंतर भाजपला मिळालेल्या निर्विवाद सत्तेने चित्र पालटले. मित्रपक्षांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याने काँग्रेसने आता 'स्वबळाचा' नारा देण्यास सुरुवात केली आहे. महापालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये काँग्रेसने मविआपासून फारकत घेण्याचा घेतलेला निर्णय हा त्यांच्या 'राजकीय अस्तित्वाची चाचपणी' करणारा आहे. उद्धव ठाकरे यांची शिवसेना आणि शरद पवारांची राष्ट्रवादी आता किती सक्षम आहेत, यापेक्षा त्यांच्यावर किती विश्वास ठेवावा, हा काँग्रेसपुढील मोठा यक्षप्रश्न आहे. भाजपधार्जिणे राजकारण करणाऱ्यांची सोबत करण्यापेक्षा स्वबळावर लढणे काँग्रेसला अधिक सुरक्षित वाटू लागले आहे.

राज्यसभा निवडणुकीच्या वेळी मविआतील अंतर्गत कलह पहिल्यांदा उघडपणे समोर आला. शरद पवार यांच्या उमेदवारीला राज्यातील काँग्रेस नेत्यांनी तीव्र विरोध केला होता. पवारांची भूमिका वेळोवेळी भाजपला अनुकूल राहिली आहे, असा आरोप काँग्रेसच्या गोटातून झाला. दिल्लीतील नेत्यांशी संधान साधून पवारांनी उमेदवारी मिळवली असली, तरी राज्यातील नेत्यांच्या मनात असलेला संशय दूर झालेला नाही. यात नवल म्हणजे, उद्धवसेनेतही या जागेवरून धुसफूस होती. आदित्य ठाकरेंना ही जागा आपल्या पक्षासाठी हवी होती, मात्र संजय राऊत यांनी मध्यस्थी करून पवारांचा मार्ग मोकळा केला. यावरून मविआमध्ये धोरणांपेक्षा 'व्यक्तीगत हितसंबंधांना' अधिक महत्त्व दिले जात असल्याचे स्पष्ट झाले.

बारामती पोटनिवडणुकीत काँग्रेसने शरद पवारांचा सल्ला मानून माघार घेतली असली, तरी राहुरीमध्ये मात्र मविआची पुरती लक्तरे वेशीवर टांगली गेली. विखे पाटलांच्या मध्यस्थीनंतर शरद पवार गटाचे प्राजक्त तनपुरे यांनी निवडणूक न लढवण्याचा घेतलेला निर्णय धक्कादायक होता. एका माजी मंत्र्याने ऐन वेळी सत्ताधाऱ्यांच्या भूमिकेचे समर्थन करणे, हे मविआसाठी 'दगाफटका' देणारे ठरले. त्यातही शिवसेनेने (उद्धव गट) आपल्या उमेदवाराचा अर्ज कायम ठेवून राष्ट्रवादीवर अविश्वास दाखवला, तर वंचित बहुजन आघाडीनेही आपली स्वतंत्र चूल मांडली. या गोंधळात भाजपचा विजय अधिक सुकर झाला आहे.

भाजपच्या राजकीय खेळींनी महाविकास आघाडीला जर्जर केले आहे. काँग्रेसने तर केव्हाच आपले मन मविआतून काढून घेतले आहे. बारामतीमध्ये नातेसंबंध जपले जात आहेत, राहुरीमध्ये सत्ताधाऱ्यांशी तडजोडी केल्या जात आहेत, तर दुसरीकडे काँग्रेस आपला स्वतंत्र मार्ग शोधत आहे. २०१९ मध्ये जो 'मॅजिक नंबर' गाठण्यासाठी हे पक्ष एकत्र आले होते, तो उद्देश आता पूर्णपणे हरवला आहे. भाजपला रोखण्यासाठी लागणारी एकजूट आणि विश्वासार्हता मविआने गमावली आहे.

थोडक्यात सांगायचे तर, महाविकास आघाडीचा प्रयोग आता अस्ताला लागला आहे. अधिकृत घोषणा झाली नसली तरी, राज्यातील राजकीय समीकरणे पाहता मविआ आता केवळ 'नावापुरती' शिल्लक राहिली आहे. आगामी निवडणुकांमध्ये ही विस्कळीत झालेली आघाडी भाजपच्या सुसंघटित यंत्रणेसमोर कशी तग धरणार, हा खरा प्रश्न आहे. महाविकास आघाडीत बिघाडी करण्यात भाजपला आलेले यश हे विरोधी पक्षांच्या कमकुवत नेतृत्वाचे आणि आपापसातील हेवेदाव्यांचे फळ आहे.

# अमृतवाहिनी बँकेचा १२०० कोटींचा टप्पा; बिझनेस समिट २०२६ उत्साहात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : अमृतवाहिनी सहकारी बँकेने १२०० कोटी रुपयांच्या व्यवसायाचा टप्पा गाठत बँकिंग क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी नोंदवली आहे. बँकेच्या या यशाबद्दल काँग्रेसचे राष्ट्रीय वर्किंग कमिटी सदस्य तथा माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी कौतुक व्यक्त केले.

अमृतवाहिनी सहकारी बँकेच्या 'बिझनेस समिट २०२६' कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी आमदार डॉ. सुधीर तांबे, चेअरमन सुधाकर जोशी, व्हाईस चेअरमन अ‍ॅड. नानासाहेब शिंदे यांच्यासह संचालक व पदाधिकारी




उपस्थित होते.

बाळासाहेब थोरात म्हणाले की, बँकिंग क्षेत्रात ग्राहकांचा विश्वास टिकवणे अत्यंत महत्त्वाचे असून अमृतवाहिनी बँकेने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून हा विश्वास जपला आहे. बँकेच्या ७०६ कोटींच्या ठेवी असून कर्ज वितरण व वसुली दोन्ही बाबतीत उत्कृष्ट कामगिरी केली आहे.

चेअरमन सुधाकर जोशी यांनी सांगितले की, बँकेने यावर्षी ११ कोटी १७ लाख रुपयांचा ढोबळ नफा व ८ कोटी १ लाख रुपयांचा निव्वळ नफा कमावला असून नेट एनपीए शून्य टक्के आहे. बँकेच्या ११ शाखा कार्यरत असून डिजिटल व्यवहारांमध्येही मोठी वाढ झाली आहे.

कार्यक्रमात सेवानिवृत्त शाखा व्यवस्थापक रमेश पवार यांचा सत्कार करण्यात आला. तसेच उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकाऱ्यांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमास सभासद, अधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सोनई येथे एकदिवसीय हिंदू संमेलन उत्साहात; 'राष्ट्र जपा'चा संदेश



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

सोनई : महादेव मंदिर परिसरात सकल हिंदू समाजाच्या वतीने आयोजित एकदिवसीय हिंदू संमेलन उत्साहात पार पडले. या संमेलनात विविध वक्त्यांनी हिंदू समाजातील एकता, संस्कृती जतन आणि राष्ट्रप्रेम यावर भर देत राष्ट्र माझं करियर जपा असा संदेश दिला.

संमेलनात बोलताना प्रमुख वक्त्यांनी संत चोखामेळा, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याचा उल्लेख करत त्यांनी कधीही जातपात मानली नाही, असे सांगितले. हिंदू समाजाने एकत्र राहून परंपरा, संस्कृती व स्वदेशी मूल्यांचे जतन करावे, असे आवाहन करण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान लव्ह जिहाद, धर्मांतर, गोसंवर्धन, हिंदू संस्कृती आणि विज्ञान यावर आधारित विशेष प्रदर्शन भरविण्यात आले होते. या प्रदर्शनाला उपस्थितांचा मोठा प्रतिसाद मिळाला. तसेच कुटुंब व्यवस्था मजबूत ठेवणे, पर्यावरण संरक्षण, स्वभाषेचा अभिमान आणि सामाजिक जागरूकता यावरही वक्त्यांनी मार्गदर्शन केले.

या संमेलनात महिलांसह युवक, युवती आणि जेष्ठ नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. वक्ते विवेक कुलकर्णी, हभप नवनाथ महाराज म्हस्के आणि सचिन गायकवाड यांनी विविध विषयांवर आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रिया दरंदले यांनी केले. सोनई व परिसरातील नागरिकांनी संमेलनाच्या नियोजनाचे कौतुक केले.

# जी–पॅट आणि गेट परीक्षेत प्रवरा विध्यार्थ्यांचे यश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

प्रवरानगर : लोकनेते पद्मभुषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे, प्रवरा ग्रामीण औषधनिमणिशास्त्र महाविद्यालय, लोणी येथील देशभरातील नामवंत फार्मसी महाविद्यालयांमध्ये एम. फार्मसी या पदव्युतर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एन टी ए) मार्फत घेण्यात आलेल्या पूर्व परीक्षेमध्ये सहा तसेच, अभियांत्रिकी आणि विज्ञान क्षेत्रातील पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेण्यात आलेल्या भारतीय विज्ञान संस्था आणि भारतीय तंत्रज्ञान संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षण मंत्रालय, भारत सरकार यांच्या मार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेत दोन विध्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादित केले, अशी माहिती महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. के. मंगाथायारू यांनी दिली.

महाविद्यालयातील जी पॅट परीक्षेत चतुर्थ वर्ष पदवी अभ्यासक्रमातील विध्यार्थी संजना गाडेकर, चैताली ढोकणे, राजश्री डांगे, संजना भालेराव, अश्विनी मेंगळ, अनिकेत जाधव या सहा विद्यार्थ्यांनी तसेच गेट परीक्षेत शैलेश सोळंके , वैभव गुंजकर या दोन विध्यार्थ्यांनी यश संपादान केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील सर्व शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.




# राहुरी पोटनिवडणुकीत रावसाहेब खेवरे मैदानात 'तालुक्याच्या अस्मितेसाठी लढतोय'

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : राहुरी तालुक्याच्या विधानसभेच्या पोटनिवडणुकीत दिवसेंदिवस वेगळी कलात्मक असून या संदर्भात उबाठा रावसाहेब खेवरे यांनी पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका मांडली यावेळी ते म्हणाले की, राहुरी तालुक्यातील प्रतिनिधी विधानसभेत पाहिजे त्यामुळे राहुरी तालुक्यातील रावसाहेब खेवरे आमदार पाहिजे, अशी अशी राहुरी तालुक्यातील जनसामान्यांची भावना आहे. महाविकास आघाडीतील उद्धव ठाकरे सेनेचा मी कट्टर शिवसैनिक आहे. मी बंडखोरी केली नाही. जनभावनेचा आदर ठेवून राहुरी तालुक्याच्या अस्मितेसाठी निवडणूक लढवीत आहे, असे उद्गार शिवसेनेचे उद्धव ठाकरे गटाचे उत्तर जिल्हा प्रमुख रावसाहेब खेवरे यांनी पत्रकार परिषदेत आपली भूमिका स्पष्ट केली.

यावेळी डॉ. संजय म्हसे,



विलास शिरसाट, भाऊसाहेब खेवरे, राजेंद्र गुंजाळ, पोपट शिरसाठ, विजय शिरसाट, विलास ढोकणे, बाळासाहेब गाडे, रमेश खुळे, नंदू हरिश्चंद्रे आदी उपस्थित होते.

यावेळी आपली भूमिका स्पष्ट करताना रावसाहेब खेवरे म्हणाले की, महाविकास आघाडीतर्फे राष्ट्रवादीचे माजी मंत्री प्राजक्त तनपुरे जर निवडणुकीत असते, तर मी उभा राहिलो नसतो. त्यांचा निर्णय उशिरा झाल्याने मला ठाकरे सेनेचा एबी फॉर्म मिळाला नाही, त्यामुळे अपक्ष निवडणूक लढवीत आहे. गेल्या १५ ते २० वर्षे राहुरीला तालुक्याच्या बाहेरचा आमदार आहे. त्यामुळे तालुक्यातील मूलभूत व अनेक महत्त्वाचे प्रश्न प्रलंबित आहेत. राहुरी लघुऔद्योगिक वसाहतीला मुळा धरणाचे पाणी नसल्याने मोठे उद्योग सुरू होऊ शकले नाहीत. त्यामुळे स्थानिक तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या नाहीत. के. के. रेंज विस्ताराची भीती कायम असताना ७००० एकर क्षेत्रावर ॲम्युनेशन पार्क उभारण्यास राज्य सरकारने केंद्रीय संरक्षण खात्याला ना हरकत दिली आहे. राहुरीची कामधेनु असलेला डॉ. तनपुरे साखर कारखाना बंद आहे. मुळा धरणातून जायकवाडीला पाणी दिले जात असल्याने शेतीच्या आवर्तनाला, पिण्याच्या पाणी योजनांना फटका बसला आहे. त्यामुळे स्थानिक प्रश्न सोडविण्यासाठी तालुक्यातील प्रतिनिधीची गरज आहे व तालुक्याच्या भविष्यासाठी मी निवडणूक लढवीत आहे.



# डॉ. आंबेडकर स्मारकासाठी ५० लाखांचा निधी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : तालुक्यातील बेलपिंपळगाव येथे महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारक, सुशोभीकरण, संविधान भवन आदी करिता पन्नास लक्ष रुपये निधी उपलब्ध करुन देणार असल्याची ग्वाही सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाठ यांनी दिली.

नेवासा तालुक्यातील शिष्टमंडळाने याबाबत पंढरपूर चे सरपंच रोहित राऊत आणि उधोजक लक्ष्मण चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली ना. संजय शिरसाठ यांची भेट घेतली. धाडस सामाजिक संघटनेचे उत्तर महाराष्ट्र प्रमुख गणेश चौगुले,ज्ञानेश्वरी गोशाळा सचिव महेश आघाडे यांनी भीमसैनिक यांच्याशी चर्चा करुन गावात सामाजिक एकोपा निर्माण करण्यासाठी गावचे सरपंच किशोर गारुळे ज्येष्ठ मार्गदर्शक बाळासाहेब शिंदे उर्फ ठाकरे यांच्याशी चर्चा केली.

बेलपिंपळगाव येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती अध्यक्ष महेंद्र साठे, तंटामुक्ती अध्यक्ष भिमजी साठे, विष्णुपंत शिरसाठ, सागर साठे, उद्योजक लक्ष्मण चव्हाण आदी उपस्थित होते.

# रविवारी राज्यातील शेती महामंडळ कामगारांचा श्रीरामपूर येथे भव्य मेळावा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिरसगाव** : महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाचे १४ मळ्यावरील कामगार व कार्यकर्त्यांचा मेळावा दिनांक १२ एप्रिल रोजी दुपारी दोन वाजता साखर कामगार हॉस्पिटल श्रीरामपूर येथे उच्च न्यायालय संभाजीनगर व औद्योगिक न्यायालय अहिल्यानगर यांनी कामगारांच्या मागण्या संबंधी निकाल कामगारांच्या बाजूने दिले त्याची माहिती देण्यासाठी मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

उच्च न्यायालय संभाजीनगर यांनी घरभाडे व खोल्यांचे डिपॉझिट परत करण्याचा निर्णय दिला आहे.मा औद्योगिक न्यायालय अहिल्यानगर यांनी चौथा व सहावा आयोग कामगारांना देण्यासाठी निर्णय दिला. औद्योगिक न्यायालय अहिल्यानगर यांनी रोजंदारी कामगारांना रिट्रेंचमेन्ट नुकसान भरपाई देण्याचा आदेश दिला आहे.तसेच पुणे मुख्यालय येथे दिनांक १७ मार्च २०२६ रोजी कामगारांचा मोर्चा आयोजित केला होता.

त्यासंबंधी सर्व माहिती यावेळी देण्यात येणार आहे व कामगारांच्या मागण्यासंदर्भात पुढील दिशा ठरवण्यासाठी यावेळी मार्गदर्शन होईल तरी कार्यकर्त्यांनी वेळेवर उपस्थित राहावे असे आवाहन लढाकृती समिती सरचिटणीस सुभाष कुलकर्णी यांनी केले आहे.

# राष्ट्रीय ड्रॉप रो बॉल चॅम्पियनशिप स्पर्धेत चिंचोलीच्या खेळाडूंचे यश



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लोणी** : सोळाव्या राष्ट्रीय ड्रॉप रो बॉल चॅम्पियनशिप क्रीडा स्पर्धा गाजियाबाद दिल्ली येथे संपन्न झालेल्या स्पर्धेत लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या चिंचोली येथील कै. जनार्दन काळे पाटील विद्यालयातील तीन खेळाडूंनी सहभाग घेतला होता. ट्रिपल या प्रकारात त्यांना सिल्वर पदक मिळविले अशी माहिती प्राचार्य भिमराज चिंधे यांनी दिली.

यामध्ये कृष्णा शरद आरगडे, भूषण सुनील आरगडे आणि ओम दीपक शेलार यांनी स्पर्धेत चांगला खेळ करत हे यश प्राप्त केले. या विद्यार्थ्यांचे संस्थेचे संचालक अशोक गागरे,विखे पाटील कारखान्याचे संचालक बाळासाहेब लाटे, संभाजी आरगडे, सरपंच बंटी शेठ लाटे , गीताराम पठारे, उपसरपंच शरद आरगडे, दिलीप दाढकर, बाळासाहेब पारखे, शंकरराव लाटे, शंकरराव आरगडे, दिपक शेलार, अण्णासाहेब काळे, यादव काळे, संजय गागरे आदीच्या उपस्थित गौरव करण्यात आला. खेळाडूना क्रिडा शिक्षक हनुमंत गिरी यांचे मार्गदर्शन लाभले.

# जालिंदरनाथांच्या यात्रा उत्सवाला ध्वजारोहणाने प्रारंभ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : तालुक्यातील श्री क्षेत्र हंडीनिमगाव येथे प्रसिद्ध असलेल्या श्री जालिंदर नाथांच्या यात्रेनिमित्त सकाळीच कावडीने आणलेल्या पाण्याने जालिंदरनाथांच्या मूर्तीस जलाभिषेक घालण्यात आला.यावेळी त्रिवेणीश्वर महादेव मंदिरापासून कावडीची वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. त्रिवेणीश्वर देवस्थानचे महंत रमेशानंदगिरी महाराज, मध्यमेश्वर येथील महंत बालयोगी महंत ऋषिनाथ महाराज, शिनाई देवस्थानचे महंत आवेराज महाराज यांच्या हस्ते ध्वजारोहण करून यात्रेचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी मंदिर सभामंडपामध्ये झालेल्या कार्यक्रम प्रसंगी महंत रमेशानंदगिरी म्हणाले की, धार्मिक पार्श्वभूमी असलेल्या हंडीनिमगाव मध्ये जालिंदरनाथांच्या


(छाया–सुधीर चव्हाण नेवासा)

यात्रेचा उत्साह मोठ्या थाटामाटात होत असतो. यामध्ये सर्वधर्मीय समाजातील कुटुंब एकत्र येऊन हा सोहळा शांततेत पार पाडतात.जालिंदरनाथांच्या कृपेने गावातील शांतता, समन्वय असून सर्वजण एकत्र येऊन सन्मानाने राहत असतात, असेच कार्यक्रम यापुढेही सुरू ठेवा अशी अपेक्षा व्यक्त त्यांनी व्यक्त केली.

याप्रसंगी हंडीनिमगावचे सरपंच भिवाजीराव आघाव, सुरेशनगरचे सरपंच कल्याणराव उभेदळ,पांडुरंग उभेदळ, बाळासाहेब साळुंके,माजी सरपंच अण्णासाहेब जावळे,युवा नेते किरण जाधव,अमृत उभेदळ यांनी मनोगत व्यक्त करत यात्रेसाठी शुभेच्छा दिल्या.

यात्रा सोहळयाच्या निमित्ताने दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. यात्रा सोहळा यशस्वी होण्यासाठी यात्रा कमिटीचे सदस्य मनोहर जाधव,विठ्ठल पिटेकर,विजय धनाळे,रघुनाथ पिटेकर, नवनाथ पिटेकर, पांडुरंग पिटेकर,मच्छिंद्र पिटेकर,सोनू पिटेकर,विजय धनाळे,सोपान गुंजाळ,गोरख गुंजाळ, संजय पिटेकर,दत्तू पिटेकर,बाळू आळकुटे,दत्ता आळकुटे, महेश धनाळे,सतीश धनवटे आदी सदस्यांनी विशेष प्रयत्न केले. सायंकाळच्या सुमारास काढण्यात आलेल्या पालखी मिरवणूकीचे, फटाक्यांची आतषबाजी करत उत्स्फूर्त स्वागत भाविकांच्या वतीने करण्यात आले.

द • ख • ल

## ‘प्रवरा’च्या विद्यार्थ्यांची ‘माय भारत बजेट क्वेस्ट’साठी निवड



**प्रवरानगर** : भारत सरकारच्या ‘माय भारत’ उपक्रमांतर्गत आयोजित बजेट क्वेस्ट २०२६ स्पर्धेत प्रवरा अभिमत विद्यापीठाच्या दोन विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवले आहे. डॉ. बाळासाहेब विखे ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयाचा सर्फराज शेख आणि आयुर्वेद महाविद्यालयाचा अथर्व विलास भटकर यांची पुढील फेरीसाठी निवड झाली आहे.देशव्यापी निबंध व प्रश्नमंजुषा फेरीत उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल त्यांना १२ व १३ एप्रिल रोजी नवी मुंबई येथे होणाऱ्या मुख्य कार्यक्रमासाठी निमंत्रित करण्यात आले आहे. या कार्यक्रमात अथर्व भटकर यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत अर्थसंकल्पीय विषयांवर चर्चा करण्याची संधी मिळणार आहे.या यशासाठी विद्यार्थ्यांना प्राचार्य व प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या कामगिरीबद्दल कुलपती डॉ. राजेंद्र विखे पाटील यांच्यासह विद्यापीठ प्रशासनाने अभिनंदन केले आहे.

## प्रवरा पब्लिक स्कूलचे ओलंपियाड परीक्षेत यश

**लोणी** : लोकनेते डॉ बाळासाहेब विखे पाटील पद्मभूषण उपाधीने सन्मानित प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा पब्लिक स्कूलने गणित,विज्ञान व कॉम्प्युटर सायन्स ओलम्पियाड २८२५-२६ या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले. सायन्स ओलम्पियाड फाउंडेशनच्या माध्यमातून विज्ञान, गणित, इंग्रजी, सामान्यज्ञान व इंटरनॅशनल कॉम्प्युटर सायन्स अशा विविध विषयांच्या परीक्षा आयोजित करण्यात येतात. त्यामध्ये प्रवरा पब्लिक स्कूलच्या सुमारे सहाशे विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला. त्यातील सुमारे १०५ विद्यार्थ्यांनी सुवर्णपदके मिळावली. तसेच शाळेचा इयत्ता दहावीचा विद्यार्थी शिंदे सिद्धेश चांगदेव यास एस ओ एफ डिफेन्स सर्विसेस अॅकॅडमिक एक्सलन्स स्कॉलरशीप प्राप्त झाली. त्यास विशेष प्राविण्य मिळवल्याबद्दल एस ओ एफ कडून सुवर्णपदक, प्रमाणपत्र व रुपये पाच हजार चा धनादेश देऊन सन्मानित करण्यात आले. विद्यार्थ्यांना संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे यांनी विविध सेवा सुविधा तसेच तज्ञांचे मार्गदर्शन दिल्याने प्रवरेचा विद्यार्थी हा अव्वल स्थानावर आहे.

## तांदुळवाडीतील जि.प. शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात

**राहुरी** : तांदुळवाडी येथील जि.प.शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ मोठ्या उत्साहात व दिमाखात संपन्न झाला. कार्यक्रमास राहुरी पंचायत समितीच्या शिक्षण विस्तार अधिकारी इंदुमती देवरे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या.कार्यक्रमाला माजी मुख्याध्यापिका वंदना कांडेकर, प्रभुजी बाचकर, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष बाळासाहेब पेरणे, माजी अध्यक्ष भास्कर पेरणे, मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष सर्जेराव पेरणे, ग्रामपंचायत सदस्य निसार सय्यद, शिवाजी खडके, स्वाती धसाळ, अश्विनी चव्हाण, विक्रम पेरणे, मच्छिंद्र चव्हाण, अशोक तोडमल, रेवन्नाथ खडके, सुखदेव खाटेकर, रंगनाथ पेरणे, रेवन्नाथ पेरणे, शंकर गोपीनाथ पेरणे, मोहन खाटेकर, रघूनाथ हंडाळ तसेच मुख्याध्यापिका संगिता बेदरे व शिक्षक रमेश घोडके यांच्यासह विद्यार्थी, महिला, पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.प्रास्ताविक शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष तथा पत्रकार विनीत धसाळ यांनी शाळेच्या प्रगतीमध्ये ग्रामस्थांचे मोलाचे योगदान असल्याचे नमूद केले. जिल्हा परिषद शाळेची गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी व विद्यार्थी पटसंख्या वाढीसाठी सर्वांनी प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले.

## ज्योती पतसंस्थेचा एकत्रित व्यवसाय ६७४ कोटींवर

**कोपरगाव** : ज्योती सहकारी पतसंस्थेने २०२५-२६ या आर्थिक वर्षात उल्लेखनीय कामगिरी करत एकत्रित व्यवसाय ६७४ कोटी रुपयांवर नेला असून संस्थेला ४ कोटी ५० लाख रुपयांचा निव्वळ नफा झाला आहे. संस्थेचे चेअरमन अॅड. रविकाका बोरावके यांनी ही माहिती दिली.संस्थेच्या आर्थिक स्थितीत लक्षणीय वाढ झाली असून ठेवी ४०६ कोटी रुपये, कर्जवाटप २६८ कोटी रुपये आणि गुंतवणूक १६४ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. विशेष म्हणजे, संस्थेने ०.०० टक्के एनपीए कायम राखत ठेवीदारांचा विश्वास जपला आहे. त्यामुळे ग्राहकांमध्ये संस्थेबाबत विश्वास अधिक दृढ झाला असल्याचे बोरावके यांनी सांगितले.सभासद व ठेवीदारांच्या उत्तम प्रतिसादामुळे संस्थेच्या भागभांडवलात आणि व्यवसायात समाधानकारक वाढ झाली आहे. मागील आर्थिक वर्षातही संस्थेला शासकीय लेखापरीक्षणात ‘अ’ वर्ग मिळाला होता. तसेच सर्वोत्तम पतसंस्था पुरस्कार प्राप्त झाल्याने संस्थेची ओळख राज्यातील अग्रगण्य पतसंस्था म्हणून निर्माण झाली आहे.मागील वर्षाच्या तुलनेत ठेवींमध्ये ४६ कोटी (१३ टक्के), कर्जामध्ये ३३ कोटी (१४ टक्के) आणि गुंतवणुकीत १६ टक्के वाढ झाली आहे. संस्थेचा वसुली दर ६६ टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. कर्जवसुलीसाठी आवश्यक ते कठोर निर्णय घेतल्याने वसुलीत सुधारणा झाल्याचे व्यवस्थापनाने स्पष्ट केले. संस्थेच्या प्रगतीत सभासद, ठेवीदार, खातेदार, कर्जदार तसेच संचालक व कर्मचाऱ्यांचे योगदान असल्याचे नमूद करण्यात आले.

# भंडारदऱ्यातून पाण्याचा दिलासा

## बिगर सिंचनाचे आवर्तन तातडीने सुरू करण्याचे आदेश

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लोणी** : उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असताना पिण्याच्या पाण्याची टंचाई गंभीर बनू लागली आहे. या पार्श्वभूमीवर जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांनी महत्त्वपूर्ण निर्णय घेत भंडारदरा धरणातून बिगर सिंचनाचे आवर्तन तातडीने सुरू करण्याच्या स्पष्ट सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. या निर्णयामुळे संगमनेर, राहाता आणि श्रीरामपूर तालुक्यातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.



भंडारदरा धरणाच्या लाभक्षेत्रातील अनेक गावांमध्ये पाण्याची पातळी झपाट्याने खालावत चालली आहे. विहिरी, बोअरवेल आणि स्थानिक जलस्रोत आटू लागल्याने ग्रामपंचायतींसमोर पाणीपुरवठ्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. नदीकाठच्या गावांमध्येही परिस्थिती गंभीर बनली असून, नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. नगरपरिषदांच्या कार्यक्षेत्रातही हीच परिस्थिती निर्माण झाल्याने पाणीपुरवठा सुरळीत ठेवणे कठीण झाले आहे.

दरम्यान, उन्हाच्या झळा वाढत असल्याने पाण्याची मागणी सर्वच भागातून वाढली आहे. नागरिकांची गैरसोय लक्षात घेऊन मंत्री विखे पाटील यांनी तातडीने हस्तक्षेप करत बिगर सिंचनाचे आवर्तन सुरू करण्याचा निर्णय घेतला. धरणातील उपलब्ध पाणीसाठ्याचे योग्य नियोजन करून पाणी सोडण्याचे आदेश देण्यात आले आहेत.आवर्तन सुरू करताना शेवटच्या टोकावरील गावापर्यंत पाणी पोहोचेल, याची विशेष दक्षता घ्यावी, अशा स्पष्ट सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी स्थानिक प्रशासन आणि ग्रामपंचायतींनी काटेकोर उपाययोजना राबवाव्यात, असेही त्यांनी बजावले आहे.या निर्णयामुळे संगमनेर, राहाता आणि श्रीरामपूर तालुक्यातील ग्रामीण तसेच शहरी भागातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. विशेषतः पिण्याच्या पाण्याच्या समस्येने त्रस्त असलेल्या गावांसाठी हे आवर्तन जीवनदायी ठरणार असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.दरम्यान, प्रशासनानेही या निर्णयाची अंमलबजावणी जलदगतीने करण्यासाठी हालचाली सुरू केल्या असून, लवकरच पाणी सोडण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे. त्यामुळे टंचाईग्रस्त भागात पाणीपुरवठा सुरळीत होण्याची आशा व्यक्त केली जात आहे.

## झगडे फाटारांजणगाव देशमुख रस्त्यासाठी १७ कोटींचा निधी

### काम दर्जेदार करण्याची मागणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : राज्य मार्ग ६५ वरील झगडे फाटा ते रांजणगाव देशमुख (तालुका हद्द) या महत्त्वाच्या रस्त्यासाठी आमदार आशुतोष काळे यांनी पुन्हा एकदा १७ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून घेतला आहे. या निधीचा योग्य वापर करून रस्त्याचे काम दर्जेदार करण्यात यावे, अशी मागणी पोहेगाव व पंचक्रोशीतील नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे केली आहे.



आमदार काळे यांच्या सूचनेनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी गुरुवारी (दि. ९) संबंधित रस्त्याची नागरिकांसमवेत संयुक्त पाहणी केली. यापूर्वीही या रस्त्यासाठी १६.०५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला होता. मात्र, भक्कम पाया नसल्याने आणि अवजड वाहतुकीमुळे रस्ता लवकर खराब झाल्याची बाब नागरिकांनी निदर्शनास आणून दिली.

सदर मार्गावर वाढत्या अवजड वाहतुकीचा विचार करून हा रस्ता सिमेंट कॉंक्रीट पद्धतीने करण्यासाठी आमदार काळे प्रयत्नशील आहेत. दरम्यान, २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात मतदारसंघातील रस्ते व पुलांसाठी २५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, त्यापैकी १७ कोटी रुपये या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी देण्यात आले आहेत.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपकार्यकारी अभियंता वर्षराज शिंदे यांनी नागरिकांच्या सूचनांचा स्वीकार करत अंदाजपत्रक दर्जेदार पद्धतीने तयार करण्याचे आश्वासन दिले. तसेच आवश्यक ठिकाणी सी.डी. वर्कसह अन्य उपाययोजना करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.यावेळी विविध संस्थांचे पदाधिकारी, स्थानिक नेते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अंबानी यांच्या वाढदिवसानिमित्त साई प्रसादालयात मोफत जेवण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**




**शिर्डी** : रिलायन्स इंडस्ट्रीज संचालक तथा प्रसिद्ध उद्योगपती अनंत मुकेश अंबानी यांच्या वाढदिवसाच्या निमीत्ताने साईबाबा संस्थान च्या प्रसादालयात दि ९ एप्रील रोजी अन्नदाना साठी अंबानी परिवाराच्या वतीने ५ लाख रुपयांची देणगी देण्यात आल्याचे संस्थान ने प्रसिद्ध केले आहे.अंबानी परिवार साई बाबा चा निस्सीम भक्त असून निता अंबानी, मुकेश अंबानी, व अनंत अंबानी हे साईंच्या दर्शनासाठी नेहमी हजेरी लावत असतात.अनंत यांचे वाढदिवसानिमित्त रिलायन्सच्या वतीने देशभर विविध धार्मिक व सामाजिक उपक्रम राबविण्यात येत असतात. त्याचाच एक भाग म्हणून श्री साईबाबा संस्थान येथे श्री साईप्रसादालयात अन्नदानासाठी देणगी अर्पण करण्यात आली.अंबानी कुटुंबीयांची श्री साईबाबांवर दृढ श्रद्धा असून रिलायन्स फाउंडेशन मार्फत यापूर्वीही मेडिकल फंड, ऑक्सिजन प्रकल्प व विविध सामाजिक उपक्रमांसाठी महत्त्वपूर्ण योगदान देण्यात आले आहे.

## घोडेगाव येथे चित्रपट कुस्त्यांचा थरार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा फाटा** - नेवासा तालुक्यातील घोडेगाव येथील ग्रामस्थांचं ग्रामदैवत श्री घोडेश्वरी देवीच्या यात्रा उत्सवात चितपत कुस्त्यांचा थरार पाहावयास मिळाला. या परिसरात सर्वात मोठ्या असलेल्या यात्रा उत्सवाची कुस्तीच्या जंगी हगाम्याने सांगता करण्यात आली. तर शेवटच्या कुस्तीतील विजेत्या मल्लास माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्याकडून युवा नेते उदयन गडाख यांच्या हस्ते ७१ हजार रुपयांचे रोख पारितोषिक व गदा देण्यात आली. तर इतर कुस्ती विजेत्यास अनेक मान्यवरांकडून भरगच्च रकमेचे रोख इनाम देण्यात आले.



घोडेगाव (ता. नेवासा) येथील श्री घोडेश्वरी देवीच्या यात्रा उत्सवानिमित्त शेवटची कुस्ती लावतांना युवा नेते उदयन गडाख ( छाया-सोपान भगत)

या उत्सवा दरम्यान महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून घोडेश्वरी मातेवर श्रद्धा असलेल्या सुमारे तीन लाख भाविकांनी देवीचे दर्शन घेतले यामध्ये तालुक्याचे आमदार विठ्ठलराव लंघे, युवा नेते उदयन दादा गडाख, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष सचिन देसरडा, मराठा महासंघाचे संभाजी दहातोंडे यांनी मंदिरास भेट दिली यावेळी देवस्थान यात्रा कमिटीचे वसंत सोनवणे, शरद सोनवणे, अनिल सोनवणे, अरुण जाधव दीपक जाधव, सुरेश चौधरी पत्रकार अविनाश येळवंडे यांनी स्वागत केले. या यात्रा उत्सवा निमित्ताने यात्रा देवस्थान यात्रा कमिटी कडून विविध धार्मिक तसेच मनोरंजनाचे कार्यक्रम ठेवण्यात आले होते. या कार्यक्रमाला परिसरातून मोठा प्रसिद्ध प्रतिसाद मिळाला. तर यात्रेमध्ये आलेल्या खेळणी साहित्य संसार उपयुक्त साहित्य आधी दुकानांमध्ये महिलांनी मोठी गर्दी केली होती. या यात्रा उत्सवातील निवृत्ती महाराज देशमुख इंदुरीकर यांचे कीर्तन त्याचबरोबर मंदिरासह गावापासून मंदिरापर्यंत केलेली आकर्षक विद्युत रोषणाई यात्रेचे मुख्य आकर्षण ठरल.

## रावसाहेब म्हस्के यांचे म.गांधी विद्यालयासाठी मोठे योगदान

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**श्रीरामपूर** : प्रवरानगर येथील महात्मा गांधी विद्यालयाचे माजी विद्यार्थ्यांचे अमृत महोत्सवी वर्षनिमित्ताने भरीव आर्थिक योगदान लाभत असून या विद्यालयाचे माजी विद्यार्थी व माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष रावसाहेब म्हस्के यांनी नुकतेच ५१ हजार रुपयांची देणगी प्राचार्य विनायक मेथवडे यांच्याकडे सुपूर्द केली.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ हे या विद्यालयाचे अमृत महोत्सवी वर्ष आहे. हे वर्ष विविध उपक्रमाने साजरे केले जाणार आहे. या उपक्रमाची भौतिक आणि गुणवत्तेच्या दृष्टीने उपक्रमाच्या परिपूर्ततेसाठी माजी विद्यार्थ्यांकडून आर्थिक योगदान प्राप्त होत आहे. शरदचंद्र पवार हे या विद्यालयाचे माजी विद्यार्थी असल्याने त्यांनी बारामती स्क्रॅप अँड वेस्ट मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेड, बारामती यांचेकडून बहुउद्देशीय सभागृहासाठी ५० लाखांची देणगी नुकतीच मिळवून दिली आहे. विद्यालयाचे माजी विद्यार्थी रावसाहेब म्हस्के पाटील यांनी ५१ हजार रुपये तर सुरेश भागवत यांनी १११११११ रुपये देणगी दिली आहे. इतर माजी विद्यार्थ्यांकडूनही उत्स्फूर्तपणे देणगी प्राप्त होत आहे. या विद्यालयाची माजी विद्यार्थ्यांची परंपरा मोठी असून विद्यालय व शिक्षकांप्रतीचा कृतज्ञताभाव आणि आत्मीयतेच्या नात्याने माजी विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त आर्थिक योगदानासह प्रतिसाद लागत आहे. या विविध उपक्रमाच्या आयोजनासाठी रावसाहेब म्हस्के, उपाध्यक्ष अरुण कडू, एकनाथराव घोगरे, प्राचार्य विनायक मेथवडे यांचेसह शिक्षक व सेवकवर्ग विशेष प्रयत्न करीत आहे.

## बेलापूर जामा मस्जिद मागील रस्त्याची दयनीय अवस्था

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**बेलापूर** : गावातील निम्म्याहून अधिक ग्रामस्थांची हक्काची वहीवाट असलेल्या बेलापूर जामा मस्जिद मागील रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. गेल्या कित्येक वर्षापासून अद्यापही या रस्त्यावर खडी तर सोडा साधा मुरूमही पडलेला नाही.

बेलापूर गावातील मुख्य पेठे मागील गाढे गल्लीचा हा रस्ता बेलापूर जामा मस्जिद मागून तो नगर रस्त्याला मिळतो. या रस्त्याच्या गावातील निम्म्याहून अधिक ग्रामस्थ जवळचा म्हणून वापर करतात. नगर रस्त्याला येण्यासाठी हा बेलापूर गावातील शेकडो ग्रामस्थांचा खुश्कीचा मार्ग ओळखला जातो. या रस्त्यावर काही प्रमाणात अतिक्रमण देखील आहे. पादचारी दुचाकी वाले या रस्त्याचा नगर रस्त्याला लवकर आणि कमी अंतरामुळे येण्यासाठी मोठ्या प्रमाणात वापर करतात.

नगर रस्त्याला येण्यासाठी झेंडा चौकाला वळसा घालण्याऐवजी बहुतांश ग्रामस्थ या बेलापूर मस्जिद मागील रस्ता शोधतात. या रस्त्यावर गेल्या कित्येक वर्षांपासून खडीच पडली नाही. खाच खळगे आणि मोठाले खड्डे तसेच नागमोडी वळणाचा असलेला हा रस्ता गेल्या कित्येक वर्षांपासून अडगळीला पडला आहे. रस्त्याच्या एका बाजूला ग्रामीण रुग्णालयाची भिंत उभी आहे. रात्रीचा देखील येथे अंधार असतो. याच रस्त्याला खेटून शौचालय असून ते चोहोबाजूने घाण आणि आस्वच्छतेने घेरले गेले आहे. रस्त्याने ये जा करणारे नाक मुरडून येथून जातात. ग्रामस्थांमध्ये या बाबत प्रचंड असंतोष आहे.ग्रामपंचायतीने देखील या रस्त्याची दखल घेतली नाही, याबाबत ग्रामस्थ नाराज आहेत.

गावा तील सोई सुविधेचा सध्या बोजवारा उडाला आहे. गावात कोण सत्तेत आणि कोण विरोधात याबाबत गावकरी अंधारात आहेत. गावातील काही चमको पुढाऱ्यांमुळे गाव विकासापासून दूर गेले आहे.गावातील काही खराब रस्त्यांमुळे गावाचे पितळ उघडे पडले आहे. रस्ता व्हावा अशी ग्रामस्थांची मागणी तसेच मोठी संधी असतानाही हा रस्ता राजकारण करणाऱ्यांपासून दुर्लक्षित राहिला याबाबत गावकऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष आहे.वाड्या वस्त्यांवरील रस्त्याची देखील पूर्णतः दुर्दशा झालेली आहे. वर्षानुवर्ष या रस्त्यांवर खडी डांबर पडलेलेच नाही. पावसाळ्यात या वाड्या वस्त्यांवरील ग्रामस्थांचे मोठे हाल होतात. शाळकरी विद्यार्थी आणि आजारी रुग्णांना देखील या रस्त्यांचा मोठा सामना करावा लागतो.


### ग्रामपंचायत वडझरी बु।।,ता. संगमनेर जि .अहिल्यानगर

### जाहीर निविदा

ग्रामपंचायत वडझरी बु।।ता. संगमनेर जि. अहिल्यानगर येथील कामाचे सन २०२५/२६ साठी नोंदणीकृत, ठेकेदार, पुरवठादार यांच्याकडून सीलबंद निविदा मागवण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | योजनेचे नाव | प्रशासकीय मान्यता रक्कम | निविदा फी | ठेकेदार वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १) | मौजे वडझरी बु.गावठाण येथे पेव्हींग ब्लॉक बसविणे, ता.संगमनेर | अनु.जाती व नवबौद्ध घटकांचा विकास करणे २०२५-२६ | ७,००,०००/- | २३६/- | खुला |
| २) | मौजे वडझरी बु.येथील जगताप वस्ती रस्ता कॉंक्रिटीकरण करणे, ता.संगमनेर | अनु.जाती व नवबौद्ध घटकांचा विकास करणे २०२५-२६ | ७,००,०००/- | २३६/- | खुला |
| ३) | मौजे वडझरी बु.येथील जगताप वस्ती येथे पाणीपुरवठा व्यवस्था करणे, ता.संगमनेर | अनु.जाती व नवबौद्ध घटकांचा विकास करणे २०२५-२६ | ३,००,०००/- | २३६/- | खुला |

**अटी व शर्ती** -१) निविदा फार्म माहितीपत्रक दि.१०/४/२०२६ते १६/४/२०२६ या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालयीन वेळेत मिळतील. २) बी १ निविदा दि. १७/४/२०२६ रोजी स ११ वा उघडण्यात येईल. ३) निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.

**ग्रामपंचायत अधिकारी सरपंच**
**वडझरी बु।।, ग्रामपंचायत ता संगमनेर.**



क्र.कावि/जन्म नोंद/५३९/२०२६ संगमनेर, दिनांक ३१/०३/२०२६

### जाहीरनामा

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री. आरती भाऊसाहेब अस्वले रा. सायखिंडी, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर यांनी दिनांक ०६/०३/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे रा. सायखिंडी, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथील रहिवासी असून अर्जदार यांचा/यांची स्वतः नामे आरती भाऊसाहेब अस्वले यांचा जन्म मौजे संगमनेर ता. संगमनेर जि. अहिल्यानगर येथे दिनांक ५/६/१९९१ रोजी झाला असून त्यांचा/त्यांची जन्म नोंद निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी सायखिंडी यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे. तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी सायखिंडी यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसांचे आंत, सुटटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात या कार्यालयात हरकत/तक्रार दाखल करावी. मुदतीनंतर त्या हरकतींचा/तक्रारीचा विचार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**


# धनेश्वर देवस्थान देवभार यात्रा उत्साहात

## दोन दिवस रंगणार धार्मिक व सांस्कृतिक सोहळा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनगाव** : राहुरी तालुक्यातील धानोरे येथील ग्रामदैवत धनेश्वर देवस्थानचा देवभार यात्रोत्सव सोमवार (दि. १३ एप्रिल) व मंगळवार (दि. १४ एप्रिल) रोजी पारंपरिक उत्साहात साजरा होणार आहे. यात्रेनिमित्त पंचक्रोशीतील भाविकांमध्ये उत्सुकता वाढली असून गावात सणासुदीचे वातावरण निर्माण झाले आहे. सोमवारी सकाळी देवतेचा दुग्धाभिषेक व पूजाविधी पार पडणार आहे. सायंकाळी पारंपरिक वाद्यांच्या गजरात गावातून भव्य मिरवणूक काढण्यात येणार असून, काठीच्या सनईच्या सुरांनी वातावरण भक्तिमय होणार आहे. मिरवणुकीनंतर फटाक्यांची आतषबाजी होणार आहे.

रात्री श्री साई शकुंतला वैष्णवी प्रोडक्शन निर्मित सुजाता भाटे यांचा ‘पाहुणं यायलाच लागतंय’ हा लावणी कार्यक्रम सादर होणार असून, तो यात्रेचे मुख्य आकर्षण ठरणार आहे. मंगळवारी दुपारी




कुस्त्यांच्या जंगी आखाड्याचे आयोजन करण्यात आले असून परिसरातील नामांकित मल्लांच्या झुंजी पाहण्याची संधी मिळणार आहे.

पारंपरिक कुस्ती फडामुळे यात्रेला विशेष रंगत येणार आहे. यात्रेदरम्यान विविध दुकाने, राहाटपाळणे व करमणुकीची साधने उभारण्यात येणार आहेत. या उत्सवाचे आयोजन धनेश्वर देवस्थान ट्रस्ट, युवक मंडळ व ग्रामस्थांनी केले असून, भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.


### जाहीर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः/जन्म-मृत्यु/एसआर/८३/२०२६
नेवासा दिनांक. २७/०३/२०२६

अर्जदार श्री/श्रीम-देविदास सोपान व्यवहारे, रा.नेवासा खुर्द, ता.नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन अर्जदार यांनी श्री/श्रीम/कु.शिवाण्या देवीदास व्यवहारे रा.नेवासा खुर्द यांचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म - मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे. सदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.
अ.क्र.-१, जन्म नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव-शिवाण्या देविदास व्यवहारे, गावाचे नाव-वडाळा बहिरोबा, मृत्यु दिनांक- २१/११/२०१८
करिता या जाहिर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटनाच्या तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहलिसदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**



### जाहीर नोटीस

श्रीरामपूर येथील मे. उपविभाय अधिकारी साहेब, भाग श्रीरामपूर यांचे न्यालयातील आरटीएस अपील अर्ज क्रमांक ५७/२०२६

देवदान बाबुराव साळवे व इतर --- **अर्जदार**
**विरुध्द** - १) संतोष लक्ष्मण साळवे २) रमेश उत्तम साळवे--- प्रतिवादी
३) प्रमिला उत्तम साळवे ४) विमल उत्तम साळवे -- प्रतिवादी
५) शशिकांत विल्सन साळवे ६) शैला बंडु ओहोळ-- प्रतिवादी
७) शकुंतला विल्सन साळवे ८) पायल रामदास पवार --- प्रतिवादी
९) आशितोष रामदास पवार १०) सनी विजय साळवे -- प्रतिवादी
११) किरण कलर भालेराव १२) अलका विजय साळवे--- प्रतिवादी
१३) भाऊसाहेब फिलीप साळवे १४) सुभाष फिलीप साळवे -- प्रतिवादी
१६. सोनाबाई रतन लोंढे--- प्रतिवादी १५) प्रशांत दत्तात्रय साळवे
१७) कुसुम श्रीपती सगळगिळे १८) मिराबाई छबुराव साळवे -- प्रतिवादी
प्रति,
१. संतोष लक्ष्मण साळवे २. रमेश उत्तम साळवे ३. प्रमिला उत्तम साळवे ४. विमल उत्तम साळवे ५. शशिकांत विल्सन साळवे ६. शैला बंडु ओहोळ ७. शकुंतला विल्सन साळवे ८. पायल रामदास पवार ९. आशितोष रामदास पवार १०. सनी विजय साळवे ११. किरण कलर भालेराव १२. अलका विजय साळवे १३. भाऊसाहेब फिलीप साळवे १४. सुभाष फिलीप साळवे १५. प्रशांत दत्तात्रय साळवे १६. सोनाबाई रतन लोंढे १७. कुसुम श्रीपती सगळगिळे १८. मिराबाई छबुराव साळवे रा. सर्व खडांबे खु. ता. राहुरी जि. अहिल्यानगर ज्या अर्थी अर्जदार देवदान बाबुराव साळवे व इतर रा. खडांबे खु. ता. राहुरी जि. अहिल्यानगर यांनी आपले विरुध्द या न्यायालयात, तहसिलदार राहुरी यांनी आरटीएस केस क्र. ७८/२०२२ मध्ये दि. १७/०१/२०२३ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द आर टी एस अपील दाखल केलेले आहे. सदर अर्जात आपण प्रतिवादी म्हणुन सामील आहात, आपणास या न्यायालयामार्फत वारंवार नोटीस पाठवुन देखील नोटीस बजावणी होत नाही. त्यामुळे सदर प्रकरणाचे कामकाज़ लांबणीवर पडत आहे. त्याअर्थी आपणास या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, आपण नोटीस प्रसिध्द झाल्या पासून नेमलेल्या तारखेपुर्वी म्हणजे दिनांक २४/०४/२०२६ रोजी सकाळी ११.०० व. तहसिल कार्यलय राहुरी येथे आपण स्वतः अगर आपले वकीलामार्फत हजर होवुन आपले म्हणणे दयावे. आपण हजर न राहील्यास प्रकरणाची एकतर्फे सुनावणी घेवून पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. सदरची जाहीर नोटीस आज दिनांक ०८/०४/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यांनीशी दिली आहे.

शिक्का

**उपविभागीय अधिकारी**
**श्रीरामपुर भाग श्रीरामपुर**

## पान १ वरुन

### राहुरीत भाजपशी पवारांची राष्ट्रवादी भिडणार!

टप्प्यात राजकारणाला अनपेक्षित वळण मिळालं. शरद पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसने मास्टरस्ट्रोक खेळत गोविंद मोकाटे यांना उमेदवारी जाहीर केली आणि निवडणुकीत ट्विस्ट आला. त्यामुळे भाजपसमोर थेट लढत उभी राहिली आहे. त्यातच वंचित बहुजन आघाडीनेही संतोष चोळके यांना उमेदवारी देत निवडणूक लढवण्याचा निर्णय कायम ठेवला. त्यामुळे तिसरा महत्त्वाचा पर्याय मतदारांसमोर उभा राहिला आहे. अपक्ष उमेदवारांनीही मोठ्या संख्येने अर्ज दाखल केल्याने मतांचे विभाजन होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. एकूणच, बिनविरोध होण्याच्या उंबरठ्यावर असलेली राहुरी पोटनिवडणूक आता बहुरंगी आणि चुरशीची होणार आहे. भाजपचे अक्षय कर्डिले यांच्यासमोर आता केवळ औपचारिक लढत नसून, राष्ट्रवादी आणि वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांमुळे खरी कसोटी लागणार आहे.आता या निवडणुकीत मतदारांचा कौल कोणाच्या बाजूने जातो, आणि स्थानिक समीकरणे कोणाला साथ देतात, याकडे संपूर्ण राज्याचं लक्ष लागलं आहे.

### संघर्षाचा 'डाव' अर्ध्यावर मोडला...

होती, म्हणूनच तो गरिबांसाठी धावून जायचा अशी भावना व्यक्त करताना एरंडोली गावच्या ग्रामस्थांना अश्रू अनावर झाले. तीन वर्षांपूर्वीच राकेश यांचा विवाह झाला होता. त्यांना दोन वर्षांची एक चिमुकली मुलगी आहे. तहसीलदार झाल्यानंतर कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा होत होती, शेतीचा विकास सुरू होता. पण सुखाचे हे दिवस पाहण्याचे नशीब फार काळ टिकले नाही. ज्या शाळेत (शहीद अभयकुमार पाटील विद्यालय) त्यांनी यशाची पहिली पायरी चढली, आज त्याच शाळेच्या परिसरात आणि गावात त्यांच्या निधनामुळे शोककळा पसरली आहे. एका जिद्दी तरुणाचा, एका आदर्श पुत्राचा आणि एका संवेदनशील अधिकाऱ्याचा असा दुर्दैवी अंत समाजाला चटका लावून जाणारा आहे. कष्टाने मिळवलेली ही खुर्ची आणि मान-सन्मान कायम राहिला, पण तो भोगण्यासाठी आज राकेश आपल्यात नाहीत. भावपूर्ण श्रद्धांजली!

### ईडी ची वरात कोयटेंच्या दारात!

आला असला, तरी पतसंस्थेच्या धोरणात्मक निर्णयांमध्ये चेअरमनची भूमिका महत्त्वाची असल्याने संशयाची सुई काका कोयटे यांच्याकडे वळली आहे. आपल्यावरील आरोपांनंतर काका कोयटे यांनी शिर्डीत पत्रकार परिषद घेऊन संस्थेचे सर्व व्यवहार कायदेशीर असल्याचा दावा केला आहे. कॅप्टन खरातसोबतचे व्यवहार नियमात राहूनच केल्याचे त्यांनी स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. मात्र, शंभर खात्यांमधील 'नॉमिनी' आणि व्यवहारांची व्याप्ती पाहता, हा केवळ कायदेशीर व्यवहार आहे की जाणीवपूर्वक केलेले मनी लॉंड्रिंग, याचा शोध यंत्रणा घेत आहेत. शिर्डी येथील शेतकरी रावसाहेब गोंदकर यांच्या जमीन लुबाडणूक प्रकरणातही खरातचे नाव समोर आले होते. नाशिक एसआयटीच्या अधिकाऱ्यांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे आता ईडीचे अधिकारी समता पतसंस्थेतील आर्थिक उलाढालींची माहिती गोळा करत आहेत. राजकीय आणि सहकार क्षेत्रात वजन असलेल्या कोयटे यांच्यासाठी आगामी काळ अडचणीचा ठरू शकतो, अशी चर्चा सध्या शिर्डी आणि परिसरात रंगली आहे. खरातने पोलीस कोठडीत दिलेल्या माहितीनुसार आणि तांत्रिक पुराव्यांच्या आधारे, आता केंद्रीय यंत्रणा या प्रकरणाच्या मुळाशी जाण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे 'ईडी'ची वरात खरोखरच कोयटेंच्या दारात पोहोचते का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### ३४ हजार कलावंतांना शासनाचा 'मदतीचा हात'

वाढवली गेल्याने मदत घेणाऱ्यांची संख्या झपाटयाने वाढत आहे. संगीत, नाटक, लोककला, चित्रकला आणि शिल्पकला या कला क्षेत्रातील कमीत कमी १५ ते २० वर्षाचा अनुभव असलेल्या कलाकाराला ही आर्थिक मदत दिली जाते. त्यासाठी या कलाकराची आर्थिक स्थिती दुर्बळ आणि ५० वर्षाची अट हे दोन प्रमुख निकष आहेत. उत्पन्नाचे दुसरे साधन नसलेल्या कलाकरांना हा लाभ दिला जातो. राज्यातील जिल्हा पातळीवर या कलाकरांच्या अर्जाची छाननी केली जाते. आर्थिक मदतीची रक्कम वाढल्यानंतर गेल्या दोन वर्षात लाभ घेणाऱ्या कलाकारांची संख्या वाढली आहे. ती आता ३४ हजाराच्या घरात गेली आहे. प्रत्येक जिल्हानिहाय १०० कलाकरांचे अर्ज मागवण्यात आलेले आहेत. या मदतीसाठी सरकारने या वर्षी २२५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. याशिवाय शासनाने जिल्ह्यातील जेष्ठ कलाकारांसाठी १०० अर्जांची मर्यादा ठेवली आहे. राज्यातील कानाकोपऱ्यातून या मदतीसाठी अर्ज येत असतात. काही कलाकारांचे निधन होत असल्याने ही संख्या कमी होते पण नवीन येणारे अर्जांची संख्या दरवर्षी वाढत असल्याचे एका उच्च अधिकाऱ्याने सांगितले.

### आयटी कंपनीत महिला अत्याचार अन् धर्मांतराचे रॅकेट

नोकरीच्या मुलाखतीपासूनच महिलांना लक्ष्य करण्याची ही पद्धत अत्यंत गंभीर असल्याचे पोलिसांनी म्हटले आहे. या रॅकेटमध्ये आणखी किती जणांचा समावेश आहे आणि किती महिला या शोषणाला बळी पडल्या आहेत, याचा कसून तपास मुंबई नाका पोलीस करत आहेत.

### प्राचार्याकडून उकळली सात लाखांची खंडणी

संगनमताने जाळ्यात ओढले. तुमच्यावर 'पॉक्सो' (बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा) अंतर्गत गंभीर गुन्हा दाखल होऊ शकतो आणि तुम्हाला अटक केली जाईल, अशी भीती या पोलिसांनी दाखवली. पोलीस असल्याचे सांगून कायदेशीर कारवाईची प्रचंड दहशत निर्माण केली आणि प्रकरण मिटवण्यासाठी ७ लाख रुपयांची मागणी केली. अटकेच्या आणि बदनामीच्या भीतीने पीडित प्राचार्यांनी ही रक्कम या पोलिसांना दिली. मात्र, हा सर्व प्रकार संशयास्पद वाटल्याने त्यांनी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडे धाव घेतली. पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्याकडे ही तक्रार प्राप्त होताच, त्यांनी तत्काळ चौकशीचे आदेश दिले. प्राथमिक चौकशीत पोलिसांचा सहभाग स्पष्ट झाल्यानंतर पोलीस आयुक्तांनी कडक भूमिका घेत गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले. यामध्ये विशेषतः शिवाजीनगर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेली आणि सोशल मीडियावर 'रील स्टार' म्हणून प्रसिद्ध असलेली महिला पोलीस कर्मचारी सोनाली हिंगे हिचा समावेश असल्याने चर्चांना उधाण आले आहे.

# ओझर खुर्द येथील नेमबाई देवीच्या डोंगराला आग

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**आश्वी** : संगमनेर तालुक्यातील ओझर खुर्द येथील नेमबाई देवी डोंगराला बुधवारी (दि. ८) दुपारी भीषण आग लागली. या आगीत डोंगरावरील वनसंपदा जळून खाक झाली असून परिसरातील जैवविविधतेचे मोठे नुकसान झाल्याचा अंदाज स्थानिक नागरिकांनी व्यक्त केला आहे. स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी दुपारी २ ते ३ वाजेच्या सुमारास डोंगर पायथ्यापासून धुराचे लोट आकाशात झेपावताना नागरिकांना दिसले. सोशल मीडियावर या धुराचे (आगीचे) व्हिडिओ व्हायरल होताच स्थानिक तरुण आणि ग्रामस्थांनी डोंगराच्या दिशेने धाव घेतली. मात्र, वाऱ्याचा वेग आणि कोरडा पालापाचोळा यामुळे आग वेगाने पसरत गेली. नागरिकांनी आग विझवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले, परंतु तोपर्यंत डोंगरावरील लहान-मोठी जंगली झाडे, पालापाचोळा आणि गवत जळून खाक झाले होते.

या आगीत केवळ झाडेच नाही, तर डोंगरावर वास्तव्यास असलेल्या पशु-पक्ष्यांची घरटी आणि इतर जैवविविधतेचे देखील नुकसान झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे. घटनेची माहिती मिळताच वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन परिस्थितीची पाहणी केली. ही आग नैसर्गिक कारणाने लागली की कुणी जाणीवपूर्वक लावली, याबाबत कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. वनविभागाकडून सध्या या आगीमुळे झालेल्या नुकसानीचा अंदाज घेतला जात असला तरी, अंधार आणि इतर अडचणीमुळे पाहणी करण्यात अडथळे येत असल्याची माहिती मिळाली आहे. दरम्यान, उन्हाळ्याच्या दिवसात डोंगराळ भागात वणवा लागण्याच्या घटना वाढत आहेत.

अशा घटना रोखण्यासाठी वनविभागाने चोख बंदोबस्त ठेवावा आणि डोंगर परिसरात गस्त वाढवावी, अशी मागणी ओझर खुर्द येथील ग्रामस्थांनी केली आहे.

# SIR मॅपिंगसाठी बीएलओशी संपर्क साधा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**गंगापूर** : निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार याद्यांचे सखोल पुनरीक्षण (SIR) कार्यक्रमांतर्गत गंगापूर विधानसभा मतदारसंघात मतदार यादी अद्ययावत करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी आपल्या क्षेत्रातील मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांच्याशी संपर्क साधून डखठ मॅपिंग तात्काळ पूर्ण करून घ्यावे, असे आवाहन तहसीलदार नवनाथ वगवाड यांनी केले आहे. या मोहिमेत मतदार यादीतील अस्पष्ट छायाचित्रे, तर्कहीन नोंदी तसेच डेमोग्राफिक सिमिलर एन्ट्रीज (DSE) यांची पडताळणी केली जात आहे. तसेच २००२ सालच्या विशेष पुनरीक्षण यादीतील मतदारांशी सध्याच्या मतदारांचे मॅपिंग करण्यात येत आहे. मतदार यादी अधिक अचूक व पारदर्शक करण्यासाठी ही प्रक्रिया महत्त्वाची मानली जात आहे.जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांच्या आदेशान्वये डखठ मॅपिंगसाठी १० एप्रिल ते १७ एप्रिल २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. या कालावधीत सर्व BLO व पर्यवेक्षकांना पूर्णवेळ कार्यमुक्त करण्यात आले आहे. १७ एप्रिलनंतर मॅपिंग न केल्यास मतदार यादीतून नाव वगळले जाण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी आपल्या कुटुंबातील सर्व पात्र सदस्यांची नोंद तपासून घ्यावी. या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन तहसीलदार नवनाथ वगवाड व नायब तहसीलदार मयुरा पेरे यांनी केले आहे.

# वैजापूरात शांतता कमिटीची बैठक

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**वैजापूर** : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती व वैजापूर शहरातील हिंदु मुस्लिम ऐक्याचे प्रतिक मानल्या जाणारे नौगाजी बाबा उर्स शरीफ हे दोन्ही उत्सव शांततेत व सौहार्दपूर्ण वातावरणात साजरे करा असे आवाहन पोलिस निरीक्षक सत्यजित ताईतवाले यांनी ०९ एप्रिल रोजी शांतता कमिटी बैठकी दरम्यान बोलताना केले. १४ एप्रिल रोजीचा उत्सव व १५ एप्रिल पासून सुरू होणाऱ्या नौगाजी बाबा उर्स शरीफच्या पार्श्वभूमीवर येथील पोलिस ठाण्याच्या प्रांगणात या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी बोलताना पोलिस निरीक्षक सत्यजित ताईतवाले म्हणाले की, हे दोन्ही उत्सव शांतता व बंधुभावात साजरे करून शहरात बंधुत्वाचा संदेशासह कायदा व सुव्यवस्था टिकून राहावी या साठी सर्वांनी पोलिस प्रशासनाला सहकार्य करावे. मात्र उत्सव काळात असामाजिक तत्वांनी शांतता व सुव्यवस्था विस्कळीत करण्याचा प्रयत्न केला तर अशां विरुद्ध कठोर कारवाई केली जाईल. गत काळातील काही अनुचित प्रकार पुन्हा घडू नये यासाठी शहरात ठिकठिकाणी लावण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या माध्यामातून पोलिसांची असामाजिक तत्वावर करडी नजर राहणार आहे असा इशारा देखील त्यांनी यावेळी दिला.

बैठकी दरम्यान उपस्थित शांतता कमिटी सदस्यांनी पोलिस प्रशासनाला काही सूचना देखील केल्या. बैठकीला उपविभागीय पोलिस अधिकारी भागवत फुंदे, काझी हाफीजुद्दीन, प्रकाश बोथरा, विनोद राजपूत, ऐराज शेख, निलेश पारख, विजय त्रिभुवन, जयमाला वाघ, सुप्रिया व्यवहारे, अंजली जोशी,मंजुषा ढाकरे, धोंडिरामसिंग राजपूत, गोपनीय शाखेचे ज्ञानेश्वर मेटे,रणजीत चव्हाण, पोहेकॉ योगेश झाल्टे, अमोल कांबळे, प्रशांत गीते यांच्यासह शांतता कमिटी सदस्य व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# समायोजन प्रक्रिया पारदर्शक राबवावी : शिक्षकसेनेची मागणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**गंगापूर** : शिक्षक समायोजन प्रक्रिया पारदर्शक व न्याय्य पद्धतीने राबविण्यात यावी अशी मागणी शिक्षकसेनेच्या वतीने पंचायत समितीचे उपसभापती राजेश्वर हिवाळे व गटशिक्षणाधिकारी अरविंद कापसे यांच्याकडे निवेदनात करण्यात आली आहे. दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की रिक्त पदांची यादी समायोजन प्रक्रियेच्या एक दिवस आधी जाहीर करावी, संपूर्ण प्रक्रिया मोठ्या स्क्रीनवर पारदर्शक पद्धतीने राबवावी, शिक्षकांना शाळा निवडण्यासाठी पुरेसा वेळ द्यावा तसेच महिला शिक्षिकांना शाळा निवडण्यात अडचण निर्माण झाल्यास नातेवाईकांशी फोनवर संपर्क करण्याची संधी द्यावी, तसेच समायोजन स्थळी संघटनांच्या प्रतिनिधींना उपस्थित राहण्याचीही परवानगी द्यावी.

यावेळी उपसभापती राजेश्वर हिवाळे यांनी या मागण्यांची तात्काळ दखल घेत गटशिक्षणाधिकारी श्री. अरविंद कापसे यांच्याशी दूरध्वनीवर संपर्क साधून रिक्त पदांची यादी आजच जाहीर करण्याच्या सूचना दिल्या. यावेळी माजी पंचायत समिती सदस्य बद्रीनाथ चव्हाण,शिक्षक सेना मराठवाडा उपाध्यक्ष अनिल काळे, जिल्हा सरचिटणीस भगवान हिवाळे, तालुका अध्यक्ष राजेंद्र बोल्डे, तालुका कार्याध्यक्ष निलेश कहाटे, तालुका प्रसिद्धीप्रमुख जावेद पटेल, ज्ञानेश्वर पवार यांचेसह शिक्षकसेना पदाधिकारी उपस्थित होते.

## निधन वार्ता

### जगनाथ म्हसे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : तालुक्यातील कोंढवड येथील जगन्नाथ भाऊसाहेब म्हसे (वय ६८) यांचे दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन भाऊ, एक मुलगा, तीन मुली, पुतणे, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. ते मारूती व बाबासाहेब म्हसे यांचे बंधू, रवींद्र म्हसे यांचे ते वडील, तर दिगंबर व क्रांतीसेनेचे मधुकर म्हसे यांचे ते चुलते होत.

### गोदावरी सोनवणे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**पुणतांबा** : येथील सौ. गोदावरी रघुनाथ सोनवणे ( वय ८० ) यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या मागे पती चार मुले व एक मुलगी असा परिवार आहे तुळशीदास श्याम, रामदास व सतीश यांच्या त्या मातोश्री तर बाजारपेठेतील विठ्ठल मंदिरात गेल्या ४० वर्षापासून गीतापीठाचे व्यासपीठ चालक श्री रघुनाथ सोनवणे यांच्या त्या पत्नी होत.


### सुनिल सोनवणे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**पानेगांव** : नेवासा तालुक्यातील पानेगांव ग्रामपंचायत माजी उपसरपंच सुनिल एकनाथ सोनवणे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले (वय ६१) त्यांच्या पश्चात आई,पत्नी, दोन मुले, एक बहिणी मेव्हणे असा त्यांचा परिवार आहे. श्री गणेश कॉम्प्युटरचे संचालक शिवाजी सोनवणे यांचे वडील होत.

# होमिओपॅथी : सुरक्षित बहुआयामी उपचार पद्धती



आज १० एप्रिल म्हणजेच जागतिक होमिओपॅथिक दिवस. विश्वाला होमिओपॅथीच्या रूपाने संपूर्ण सुरक्षित असे वैद्यक शास्त्र देणाऱ्या डॉ. सॅम्युअल हानेमान यांचा जन्मदिवस. त्यांच्या सन्मानार्थ हा दिवस जागतिक होमिओपॅथी दिवस म्हणून जगभर साजरा केला जातो. या काळात १० एप्रिल ते १७ एप्रिल हा 'जागतिक होमिओपॅथी जनजागृती सप्ताह' म्हणून पाळला जातो. साधारणपणे दोन दशकांपूर्वी सन १७९६ मध्ये डॉ. सॅम्युअल हानेमान यांनी अथक संशोधनानंतर होमिओपॅथी वैद्यक शास्त्राचा शोध लावला. सिमिलिया सिमिलीबस क्यूरेचर म्हणजे काट्याने काटा काढणे या तत्त्वज्ञानावर हे शास्त्र आधारित असून, हे असे एकटे शास्त्र आहे ज्यामध्ये औषधांचे सप्रमाण सिद्धीकरण हे अगोदर मानवावर केले जाते आणि मग ते बाजारामध्ये औषधोपचार साठी उपलब्ध होते. मन आणि शरीर या दोन्ही स्तरांवर परिणामकारक उपचार करणारे हे एकमेव शास्त्र आहे, असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. याचा प्रत्यय करोनाच्या काळात असंख्य रुग्णांना आलेलाच आहे. आजच्या या धकाधकीच्या जीवनात वैयक्तिक, कौटुंबिक, नोकरी/व्यवसाय, सामाजिक जडणघडणीत होणाऱ्या मानसिक ताणतणावांचा आपल्या मानसिक व शारीरिक जीवनावर प्रचंड आघात होतात. या ताणतणावांचा परिणाम म्हणजेच उच्च रक्तदाब, मधुमेह, थायरॉईड, सोरायसिस, निद्रानाश, वारंवार पित्ताचा त्रास यासारख्या आजारांचा ससेमिरा मागे लागतो. खूपदा मनामध्ये नैराश्य, भीती, दडपण, राग, द्वेष, मत्सर मनामध्ये काहूर माजवतात. अशा या शारीरिक व मानसिक आजारांवर अचूक प्रहार करण्याची आपली क्षमता होमिओपॅथीने प्रत्येक वेळेस सिद्ध केलेली आहे. आज आपल्या देशामध्ये अनेक होमिओपॅथी तज्ञांनी करोडो रुग्णांना होमिओपॅथी उपचार करून रोगमुक्त केलेले आहे. जगामध्ये दुसऱ्या क्रमांकावर वापरले जाणारे हे औषधोपचार शास्त्र दुष्परिणाम विरहित असल्यामुळे लोकांचा या शास्त्राकडे दिवसेंदिवस कल वाढत आहे, ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. तरी अशी ही संपूर्ण सुरक्षित बहुआयामी उपचार पद्धती अधिकाधिक समाजाभिमुख व्हावी, हीच या जागतिक होमिओपॅथी दिनाच्या निमित्ताने सदिच्छा...

**डॉ. प्रकाश खेडकर**
संचालक- डॉ खेडकर होमिओपॅथिक क्लिनिक, नेवासा व कुकाणा.
सर्जरी विभाग प्रमुख
अटल बिहारी वाजपेयी होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज नेवासा
मोबाईल. ९९२२३९५३५७

# सनफ्रेश ॲग्रो इंडस्ट्रिजकडून साखर कामगार हॉस्पिटलला अत्याधुनिक रुग्णवाहिका




प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : सामाजिक बांधिलकी जपत सनफ्रेश ॲग्रो इंडस्ट्रिज प्रा. लि. यांच्या वतीने साखर कामगार हॉस्पिटलला अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज रुग्णवाहिका प्रदान करण्यात आली. या उपक्रमामुळे परिसरातील रुग्णांना तातडीने वैद्यकीय सेवा उपलब्ध होण्यास मोठी मदत होणार आहे. नवीन रुग्णवाहिकेमुळे आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना वेगाने आणि सुरक्षितपणे उपचारासाठी हलविणे शक्य होणार असून आरोग्य सेवेत कार्यक्षमता वाढणार असल्याचा विश्वास हॉस्पिटल प्रशासनाने व्यक्त केला.

या कार्यक्रमास कंपनीचे प्लांट हेड विजय गजभिये, क्वालिटी हेड जुबेर अली खान, मानव संसाधन विभागाचे ललित घोडके, संजय पटेल, बाळासाहेब खरात, मंगेश यादव व रामअशिश यादव उपस्थित होते.

तसेच साखर कामगार हॉस्पिटल ट्रस्टचे सचिव अविनाश आपटे, विश्वस्त ज्ञानदेव आहेर, वैद्यकीय संचालक डॉ. रवींद्र जगधने, डॉ. शरद सातपुते, तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर यावेळी उपस्थित होते. समाजाप्रती असलेली जबाबदारी लक्षात घेऊन हा उपक्रम राबविण्यात आल्याचे कंपनीच्या प्रतिनिधींनी सांगितले.

# लोणी खुर्दमध्ये स्वच्छता व पर्यावरणासाठी अत्याधुनिक प्रकल्पांची सुरुवात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**प्रवरानगर** : राहाता तालुक्यातील लोणी खुर्द येथील चिकन-मटण मार्केट परिसरात स्वच्छता व पर्यावरण संवर्धनाला चालना देणाऱ्या दोन महत्त्वपूर्ण प्रकल्पांचे उद्घाटन भाजप प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. सुमारे ५० लाख रुपये खर्चाची अत्याधुनिक पशुदाहिनी व ९३ लाख रुपये खर्चाचा सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प अशा एकूण १ कोटी ४३ लाख रुपयांच्या या उपक्रमामुळे परिसरातील स्वच्छता व आरोग्य व्यवस्थापन अधिक सक्षम होणार आहे. हा प्रकल्प जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली साकारण्यात आला असून, अहिल्यानगर जिल्ह्यातील हा पहिलाच अत्याधुनिक उपक्रम असल्याचे सांगण्यात आले.

यामुळे बाजारपेठ परिसरातील कचरा व सांडपाण्याचे शास्त्रोक्त व्यवस्थापन शक्य होणार आहे. यावेळी डॉ. विखे पाटील म्हणाले की, चिकन व मटण मार्केटमधील अवशेषांची सुरक्षित विल्हेवाट लावण्यासाठी ही पशुदाहिनी महत्त्वाची ठरणार आहे. या प्रक्रियेत अवशेष पूर्णपणे जळून राख तयार होते व त्या राखेचा सेंद्रिय खत म्हणून उपयोग करता येणार आहे. त्यामुळे पर्यावरणपूरक व्यवस्थापनाला चालना मिळणार आहे. सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्पामुळे दूषित पाण्याचे योग्य प्रकारे प्रक्रिया करून परिसरातील स्वच्छता व आरोग्य सुधारण्यास मदत होणार आहे. स्थानिक नागरिकांसाठी ही सुविधा उपयुक्त ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला. या प्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर गोंदकर, संचालक राहुल धावणे पाटील, दत्तात्रय गोरे पाटील, दिलीपराव गाडेकर, सचिव एस. मोटे तसेच व्यापारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान व्यापाऱ्यांच्या वतीने डॉ. सुजय विखे पाटील यांचा सत्कार करण्यात आला. या प्रकल्पांमुळे लोणी परिसरात स्वच्छता व्यवस्थापन अधिक प्रभावी होऊन पर्यावरणपूरक विकासाला गती मिळणार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 22/12/2025 to 26/12/2025 | 220 41 470 | 160 76 466 | 600 67 449 | 680 47 340 | 336 27 368 |
| 29/12/2025 to 02/01/2026 | 259 63 599 | 340 75 348 | 250 71 344 | 136 05 140 | 123 64 699 |
| 05/01/2026 to 09/01/2026 | 477 86 178 | 458 73 580 | 355 34 338 | 239 46 259 | 123 67 188 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | 134 87 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |
| 02/03/2026 to 06/03/2026 | 130 47 269 | 244 03 247 | *** ** *** | 257 48 279 | 466 65 249 |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *

## नशिबाची परिक्षा

शुक्रवार दि. १० एप्रिल २०२६

**मिलनम डे**

उदय-अस्त सिंगल ५-१-९ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| १५६<br>२४६<br>६६० | २-९ | १२६<br>४५०<br>९०० | २१-३९-७४-५८-९० |

**कल्याण**

उदय-अस्त सिंगल ९-४-५ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| १३०<br>५९०<br>७७० | ४-२ | १२९<br>४८०<br>२२८ | ४०-६२-५३-७१-२९ |

**मुंबैम (मेन)**

उदय-अस्त सिंगल ४-७-९ मजबुत

| | | जोड |
|---|---|---|
| १४५<br>३७०<br>४०० | १२०<br>६७०<br>५८० | ०७-४३-२१-९८-३५ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

# शेवगावात देहविक्री प्रकरण उघड; तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव** : शेवगाव शहरात देहविक्रीच्या संशयावरून पोलिसांनी कारवाई करत तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. महिलांना जबरदस्तीने अनैतिक संबंध ठेवण्यास भाग पाडल्याचा गंभीर आरोप या प्रकरणात करण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ८ एप्रिल २०२६ रोजी रात्री सुमारे ९.४५ वाजण्याच्या सुमारास शेवगाव-नेवासा मार्गावरील सूर्या लॉजिंगमध्ये ही घटना घडली. या प्रकरणी महिला पोलीस हेडकॉन्स्टेबल अनिता कानिफनाथ पवार (एएचटीयू) यांनी फिर्याद दिली आहे.




या फिर्यादीवरून नारायण अंकुश झाडे (रा. भेंडा ऑफिसजवळ, शेवगाव), विशाल अर्जुन व्यवहारे (रा. नवीन दहिफळ, ता. शेवगाव) आणि प्रवीण सुरेश लांडे (रा. शेवगाव) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १४३(३) तसेच स्त्री व मुली अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम, १९५६ च्या कलम ३, ४, ५, ७ व ८ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

तक्रारीनुसार, आरोपींनी पीडित महिलांना लॉजवर बोलावून त्यांच्यासाठी राहण्याची व्यवस्था केली. त्यानंतर पुरुष ग्राहकांना तेथे बोलावून पैशांच्या मोबदल्यात महिलांकडून देहविक्री करून घेतली जात होती.

तसेच महिलांना बळजबरीने अनैतिक संबंध ठेवण्यास भाग पाडले जात असल्याचेही समोर आले आहे. या व्यवहारातून मिळणाऱ्या पैशांपैकी काही रक्कम महिलांना देऊन उर्वरित रक्कम आरोपी स्वतःकडे ठेवत असल्याची माहितीही उघड झाली आहे.

या प्रकरणी गुन्हा ९ एप्रिल २०२६ रोजी पहाटे १.३८ वाजता नोंदविण्यात आला असून अद्याप कोणालाही अटक करण्यात आलेली नाही. पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

# शेवगांवातील सहा पंचायतीच्या एकेक रिक्त जागांचा निवडणूक कार्यक्रम जाहीर

## २८ एप्रिलला होणार मतदान

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**एरंडगांव** : शेवगांव तालुक्यातील सहा ग्रामपंचायतींच्या प्रत्येकी एकेक रिक्त जागांच्या पोटनिवडणुक कार्यक्रम जाहीर झाला असून १३ मार्च पर्यंत उमेदवारी अर्जदार दाखल करायचे असून २८ एप्रिलला मतदान होऊन २९ ला निकाल जाहीर होणार असल्याची माहिती निवडणूक नायबतहसीलदार राजेंद्र बकरे, सहाय्यक सुरेश बर्डे यांनी दिली .

या निवडणूक लागलेल्या सहा ग्रामपंचायतीपैकी दहिगाव ने,खानापूर आणि प्रभूवाडगाव येथील सदस्यांनी राजीनामे दिले आहेत तर आव्हाणे ग्रामपंचायतचे विनायक कळमकर व भायगाव ग्रामपंचायतचे विठ्ठल पालवे यांचे निधन झाल्याने त्या जागा रिक्त झाल्या आहेत . तसेच कुरुडगाव येथील सरपंच श्रीमती चंद्रकला कल्याण कवडे या शेवगाव येथे सध्या गाजत असलेल्या शेअर मार्केटिंग घोटाळ्यातील प्रमुख आरोपी असल्याने त्या गेल्या जुलैपासून फरार असल्याने त्यांना महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ चे कलम ( ४० )(१ ) ब नुसार अपात्र घोषित करण्यात आल्याने कुरुडगावच्या सरपंच पदाची निवडणूक देखील याचवेळी घेण्यात येणार आहे

तसेच माहे जानेवारी ते डिसेंबर २०२६ पर्यंत मुदत संपणाऱ्या शेवगाव तालुक्यातील ४८ग्राम पंचायतींची नवीन प्रभाग रचना देखील नुकतीच करण्यात आली असून सध्या मतदार पडताळणी (एस आय आर ) कार्यक्रम चालू असल्याने त्यानंतरच अधिकृत मतदार याद्या प्रसिद्ध होतील अशीही माहिती बर्डे यांनी यावेळी . दिली .

# अधीक्षक कार्यालयासमोर वडिलांचे उपोषण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : मुलीला सतत छेडछाड करून मानसिक त्रास देणाऱ्या तरुणावर कठोर कारवाई करावी आणि कुटुंबाला पोलीस संरक्षण द्यावे, या मागणीसाठी बुऱ्हानगर येथील युवराज शिंदे यांनी पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर उपोषण सुरू केले आहे.




युवराज शिंदे यांनी दिलेल्या निवेदनानुसार, त्यांच्या मुलीला आकाश प्रेमराज शिंदे हा तरुण वारंवार छेड काढत असून येताना-जाता त्रास देत आहे. याबाबत २६ ऑगस्ट २०२४ रोजी पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर यांच्याकडे लेखी तक्रार दिली होती. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही, असा आरोप त्यांनी केला आहे.

तसेच, ११ फेब्रुवारी २०२५ रोजी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे आझाद मैदान येथे उपोषण करून तक्रार मांडण्यात आली होती. त्यानंतर गृह खात्याकडून तातडीने कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या, तरीही संबंधित व्यक्तीवर कोणतीही कारवाई झालेली नसल्याचे शिंदे यांनी नमूद केले.

# पिसोरेखांडमध्ये जमीन बळकावण्याचा डाव उघड

## बनावट कागदपत्रांचा वापर, फसवणुकीचा प्रयत्न; मुख्य आरोपीसह पाच जणांवर गंभीर आरोप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : तालुक्यातील पिसोरे खांड येथे जमीन बळकावण्यासाठी बनावट कागदपत्रांचा वापर करून फसवणूक करण्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. मयत व्यक्तीच्या नावावरील जमिनीवर बोगस वारस निर्माण करून बेकायदेशीर हक्क मिळवण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

तक्रारदाराने दिलेल्या माहितीनुसार, तालुक्यातील पिसोरे खांड येथील गट क्रमांक १५९, २०६, २४५ व २७६ मधील जमीन त्यांच्या कुटुंबाच्या मालकीची असून संबंधित व्यक्तीचा मृत्यू दि. ६ सप्टेंबर २०२५ रोजी झाला आहे. असे असतानाही, या परिस्थितीचा गैरफायदा घेत अर्जुन भागचंद करनोर यांनी मयत व्यक्तीची पत्नी म्हणून बानूबाई रामदास करनोर असे खोटे नाते दाखवत बनावट आधार कार्ड व अन्य कागदपत्रे तयार केल्याचा आरोप आहे.या प्रकरणात पुढील व्यक्तींनी संगनमताने सहभाग घेतल्याचे नमूद करण्यात आले आहे वंदना विजय गावडे,मुन्नेर उसमान शेख,नंदा बाळासाहेब थोरात,शिवजी बिराजी श्रीराम यांच्यावर तक्रारीनुसार आरोपींनी स्वतःला कायदेशीर वारस म्हणून सादर करत खोटे दस्तऐवज महसूल प्रशासनाकडे सादर केले व शासनाची दिशाभूल करून जमिनीवर बेकायदेशीर ताबा मिळवण्याचा प्रयत्न केला.

या संपूर्ण प्रकरणी तक्रारदाराने भारतीय दंड संहिता कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१ व १२०(इ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.जमिनीचा खेळ कागदावर जिंकण्याचा प्रयत्न झाला, पण सत्याची सही अजून बाकी आहे आता प्रशासनाची पुढची चाल निर्णायक ठरणार आहे.असे तक्रादार बोलत होते दरम्यान, महसूल व पोलीस प्रशासनाने तात्काळ हस्तक्षेप करून बनावट कागदपत्रांच्या आधारे सुरू असलेली प्रक्रिया थांबवावी व संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

## द•ख•ल

### गदेवाडी येथे महात्मा ज्योतीबा फुले यांच्या जयंतीचे आयोजन

**चापडगाव** : शेवगाव तालुक्यातील गदेवाडी येथे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार, ११ एप्रिल रोजी रात्री ८ वाजता या कार्यक्रमांतर्गत अक्षय कासार यांचे प्रेरणादायी व्याख्यान होणार आहे.

या व्याख्यानात महात्मा फुले यांच्या कार्याचा आढावा, त्यांचे सामाजिक योगदान तसेच आजच्या काळातील त्यांच्या विचारांचे महत्त्व यावर मार्गदर्शन केले जाणार आहे. गावातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन ज्योतिबा फुले मित्र मंडळाकडून करण्यात आले आहे.

### भव्य मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन

**अहिल्यानगर** : समाजसेवेच्या उद्देशाने एक पाऊल, मानव सेवेसाठी या संकल्पनेतून श्री मार्कंडेय पद्मशाली उपवधू-वर सूचक बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने भव्य मोफत आरोग्य शिबिर व मोफत औषध वाटपाचे आयोजन करण्यात आले आहे. हे आरोग्य शिबिर रविवार, दि. १२ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत श्री मार्कंडेय संकुल, दातरंगे मळा, अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात डॉ. सुरेंद्र रच्चा, डॉ. लक्ष्मण वन्नम, डॉ. प्रशांत सुरकुटला, डॉ. शाम गुरुड, डॉ. साईनाथ चिंता, डॉ. योगेश मंचे, डॉ. कुणाल रच्चा, डॉ. भावना पेंडम, डॉ. रत्ना बल्लाळ (स्त्रीरोग तज्ज्ञ), डॉ. कंचन रच्चा (स्त्रीरोग तज्ज्ञ), डॉ. सुरेखा वन्नम, डॉ. प्रिती सुरकुटला, डॉ. अक्षता बडगु, डॉ. भाग्यश्री पेंडम तसेच नेत्रतज्ज्ञ डॉ. रावसाहेब बोरुडे आदी विविध तज्ज्ञ डॉक्टर सहभागी होणार असून नागरिकांना विविध आजारांवर मोफत तपासणी व मार्गदर्शन मिळणार आहे.या शिबिरामध्ये सर्वसाधारण आरोग्य तपासणी, बालरोग, स्त्रीरोग, दंत तपासणी, नेत्र तपासणी, होमिओपॅथी व आयुर्वेद सल्ला तसेच रक्तदाब, रक्तातील साखर, रक्तगट, थायरॉईड इत्यादी प्राथमिक तपासण्या ही करण्यात येणार आहेत. आवश्यक त्या रुग्णांना मोफत औषधांचेही वाटप यावेळी करण्यात येणार आहे.

### करिअरच्या नव्या वाटा खुल्या : स्नेहलय बालभवनात मार्गदर्शन कार्यक्रम

**अहिल्यानगर** : स्नेहालय संचलित बालभवन प्रकल्पाच्या माध्यमातून सेवा अवस्थेतील, गरजू, हक्कापासून वंचित तसेच आर्थिक अडचणींमुळे शिक्षणापासून दूर राहण्याची शक्यता असलेल्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याचे कार्य सातत्याने केले जात आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून इयत्ता दहावी व बारावीची बोर्ड परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांसाठी करिअर व प्रवेश मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

बोर्ड परीक्षेनंतर विद्यार्थ्यांच्या करिअरची दिशा योग्य ठरावी, त्यांना पुढील शिक्षणाच्या संधी, प्रवेश प्रक्रिया आणि आवश्यक कागदपत्रांची माहिती मिळावी, या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. बालभवन प्रकल्पाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वर्षभर खाजगी तासिकांद्वारे शैक्षणिक सहकार्यही दिले जात आहे. प्रा नदिम सय्यद यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रतिक्षा साळवे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. यावेळी मुनावर हुसेन खान यांनी विविध शैक्षणिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेसाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

# श्रीगोंदा शुगर शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**लिंपणगाव** : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा श्रीगोंदा शुगर येथे मंगळवार(दि.७) रोजी वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन सहकारमहर्षी नागवडे साखर कारखान्याचे संचालक विठ्ठलराव जंगले, लिंपणगावच्या सरपंच शोभाताई कोकाटे, ग्रामपंचायत सदस्य डॉ. दत्तात्रय गायकवाड, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संदीप कोकाटे, युवा उद्योजक सुरेश पवार माजी प्राचार्य रंगनाथ राजापुरे सर व जिजाबाई कापरे व उपस्थित पालकांच्या हस्ते करण्यात आले.

दरम्यान जिल्हा परिषद श्रीगोंदा शुगर शाळेमध्ये विविध उपक्रम नियमितपणे राबवले जातात. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी वार्षिक स्नेहसंमेलन अतिशय उत्साहात पार पडले. या निमित्ताने विद्यार्थ्यांनी गणपती गीत, शेतकरी गीत, कोळीगीत, भक्तीगीत आणि लावणी अशा विविध प्रकारच्या गाण्यांवर बहारदार नृत्ये सादर केली. या कार्यक्रमासाठी माजी विद्यार्थी संघ श्रीगोंदा शुगरचे अध्यक्ष मधुकर काळाणे ,काकासाहेब दातीर व इतर अनेक मान्यवर उपस्थित होते.

सदरचा सांस्कृतिक कार्यक्रम पाहण्यासाठी श्रीगोंदा फॅक्टरी परिसरातील पालक, नागरिक,




ग्रामस्थ आणि तरुण वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. मढेवडगाव केंद्राचे केंद्रप्रमुख भुकन व तालुक्यातील इतर शिक्षकांनीही कार्यक्रमाला भेट दिली. स्नेहसंमेलनामुळे शाळेतील वातावरण चैतन्यमय झाले होते. विद्यार्थ्यांच्या आनंदाला पारावर उरला नव्हता.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती पद्मा शिर्के (पाचपुते मॅडम), गायकवाड मॅडम, जरांडे मॅडम, खिळे मॅडम, पाचांगणे मॅडम आणि पऱ्हे मॅडम यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमासाठी वरिष्ठ अधिकारी आशुतोष पाचपुते पूर्णवेळ उपस्थित होते; त्यांनी विद्यार्थ्यांच्या कौशल्याचे कौतुक केले. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन जंगलेवाडीचे आदर्श उपक्रमशील शिक्षक नाना रसाळ सर व संदीप हिरवे सर यांनी केले.

याप्रसंगी ड. अशोकराव रोडे, सुनील जंगले, लहानु जंगले, संदीप जाधव, तसलीम शेख, दीपक दांडगे, अजय घोडके, आदिनाथ पाचपुते सर व शेलार सर यांसह मोठ्या प्रमाणावर माता-भगिनी उपस्थित होत्या. लिंपणगाव केंद्राच्या केंद्रप्रमुख श्रीमती जामदार मॅडम, काष्टी बीटचे ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी निळकंठ बोरुडे व श्रीगोंदा पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी कुसुमकुमारी कानडी मॅडम यांनी कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या.

# निरोगी आयुष्यासाठी 'एज लॉकिंग वॉकिंग रोड'उपक्रम

**अहिल्यानगर** : शहरातील आरोग्य क्षेत्रात एक अभिनव आणि ऐतिहासिक पाऊल उचलत 'एज लॉकिंग वॉकिंग रोड' या अनोख्या आरोग्य उपक्रमाचा शुभारंभ रविवार, दि. १९ एप्रिल रोजी सकाळी ८.०० वाजता होणार आहे. पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसद यांच्या संयुक्त पुढाकारातून, जनलोक अदालतमार्फत हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

पंपिंग स्टेशन या मार्गावर हा आरोग्य महामार्ग सुरू होणार असून, हा केवळ चालण्याचा रस्ता नसून नागरिकांच्या जीवनशैलीत सकारात्मक बदल घडवून आणणारा उपक्रम ठरणार आहे. वय वाढणे थांबत नाही, पण वृद्धत्व नियंत्रित करता येते! हा संदेश या मोहिमेद्वारे दिला जाणार आहे.

या उपक्रमामागे 'एज लॉकिंग' म्हणजेच वृद्धत्व नियंत्रणाची संकल्पना असून, ती विज्ञानाधारित आणि व्यवहार्य जीवनशैलीवर आधारित आहे. आयोजकांनी नागरिकांना पुढील तीन महत्त्वाच्या गोष्टींचे पालन करण्याचे आवाहन केले आहे:

दररोज ३० ते ६० मिनिटे वेगाने चालणे, ज्यामुळे हृदय, फुफ्फुसे आणि शरीराची चयापचय प्रक्रिया सुदृढ राहते. अन्नच औषध या तत्त्वावर आधारित ताज्या फळे, भाज्या आणि तंतुमय आहाराचा समावेश करणे. शरीर, मन आणि पर्यावरण यांचा समतोल साधणारी शिस्तबद्ध व जागरूक जीवनशैली अंगीकारणे. या उपक्रमात जनलोक अदालत केवळ न्यायनिवाड्यापुरती मर्यादित न राहता, आरोग्य जनजागृती, जनसहभाग, अंमलबजावणी आणि सामाजिक जबाबदारी यावर लक्ष ठेवणारी कोर्ट ऑफ क्शन म्हणून कार्यरत राहणार आहे. नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढवण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

# अन्नभेसळविरोधी धडक कारवाई

## 'लकी दूध डेअरी'चे नमुने जप्त, विक्रेत्यांत खळबळ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**शेवगाव/एरंडगाव** : अहिल्यानगर जिल्ह्यात वाढत्या अन्नभेसळीच्या पार्श्वभूमीवर शेवगाव शहरात बुधवारी सायंकाळी अन्नभेसळ प्रतिबंधक विभागाने धडक कारवाई करत मोची गल्लीतील 'लकी दूध डेरी' येथून दुधाचे व पनीर चे नमुने ताब्यात घेतले. या कारवाईमुळे शहरातील दूध व मावा विक्रेत्यांमध्ये मोठी खळबळ उडाली असून अनेकांनी दुकाने तातडीने बंद केली.

अहिल्यानगर येथील जिल्हा अन्नभेसळ सहआयुक्त अपर्णा भोईटे व निरीक्षक प्रदीप पवार यांच्या पथकाने मंगळवार दि ०७ रोजी सायंकाळी अचानक छापेमारी करत संशयित ठिकाणांची तपासणी केली. यावेळी दुधाचे व पनीर चे नमुने संकलित करून पुढील तपासणीसाठी पाठविण्यात आले. अलीकडील काळात शेवगाव तालुक्यासह जिल्ह्यात दुध भेसळीचे प्रकार वाढत असल्याने अन्न प्रशासनाने ही कारवाई अधिक तीव्र केली आहे.

कारवाई दरम्यान शहरातील काही पेढे विक्रेते व मावा व्यावसायिकांनी संशयाच्या भीतीने दुकाने बंद केल्याचे दिसून आले. बंदी असलेले ब्रँडेड पॅकिंग मावा, गुटखा तसेच इतर अन्नपदार्थांमध्ये भेसळ करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे.

अधिकाऱ्यांनी सांगितले की, जिल्ह्यात नव्याने तीन सहसंचालक व नऊ अन्नभेसळ निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आली असून, भविष्यात अशा धडक कारवाया सुरूच राहणार आहेत. नागरिकांनीही अन्न भेसळीसंदर्भात तक्रारी नोंदवण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, सामाजिक स्तरावरही अन्नभेसळ विरोधात आवाज उठू लागला असून, ग्रामीण भागात बनावट दूध तयार करणाऱ्या टोळ्यांचा पर्दाफाश करण्याची मागणी होत आहे. अन्नात भेसळ करून नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाईची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

शिवाजी चौकामध्ये डेअरी सोडून छोटे विक्रेतेही करतात भेसळ अशी चर्चा आहे, या छोट्या विक्रेत्यावरही कारवाई होणार का ? तसेच शेवगाव मध्ये अधिक कारवाया होणे अपेक्षित आहे तरच हा भेसळयुक्त दुधाचा पुरवठा बंद होईल अशी नागरिकात चर्चा आहे.

### संबंधित डेअरीतून बाराशे लिटर दुधाची दररोज विक्री

यावेळी अन्न व भेसळ प्रशासन अधिकारी प्रदीप पवार यांनी सांगितले की संबंधित डेअरीतून दररोज १२,०० लिटर दूध विकले जात आहे. त्याचा जर हिशोब केला तर बाराशे गुणिले ऐंशी याचा हिशोब केला तर दररोज ९६ हजार रुपयांचे दूध एका दूध डेअरी मधून विकले जात आहे. याबाबत शेवगावकर नागरिकांतून आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

# पारनेर बाजार समितीच्या सभापतीपदी गंगाराम बेलकर

## तर उपसभापतीपदी संदीप सालके यांची बिनविरोध निवड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पारनेर** : पारनेर तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती आणि उपसभापती निवडीचा पेच अखेर सुटला असून, सभापतीपदी अनुभवी नेते गंगाराम बेलकर तर उपसभापतीपदी खासदार निलेश लंके प्रतिष्ठानचे युवा शिलेदार संदीप सालके यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. किसनराव रासकर यांनी सभापतीपदाचा आणि किसनराव सुपेकर यांनी उपसभापतीपदाचा राजीनामा दिल्यानंतर ही रिक्त झालेली पदे भरण्यासाठी निवडणूक प्रक्रिया पार पडली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून विकास जाधव यांनी कामकाज पाहिले. निवडीनंतर खासदार निलेश लंके यांच्या उपस्थितीत नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर गंगाराम बेलकर यांना बाजार समितीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवण्याची संधी मिळाली आहे. बेलकर हे तालुक्याचे ज्येष्ठ नेते असून त्यांना प्रशासकीय कामाचा दांडगा अनुभव आहे. यापूर्वी त्यांनी पंचायत समितीचे सभापती म्हणून यशस्वीपणे काम पाहिले आहे, तसेच त्यांच्या पत्नी सौ. अरुणा बेलकर यांनीही पंचायत समितीच्या उपसभापती म्हणून जबाबदारी सांभाळलेली आहे.




दुसरीकडे, उपसभापतीपदी वर्णी लागलेले संदीप सालके हे निलेश लंके प्रतिष्ठानचे अतिशय जुने आणि विश्वासू सहकारी म्हणून ओळखले जातात. एका निष्ठावान युवा कार्यकर्त्याला संधी देऊन खासदार निलेश लंके यांनी तरुणांवर मोठा विश्वास टाकला आहे.

या निवडीपूर्वी खासदार निलेश लंके यांच्या कार्यालयात एक महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत खासदारांनी बेलकर आणि सालके यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले आणि त्यानुसार ही निवड बिनविरोध झाली. साधारण तीन वर्षांपूर्वी खासदार लंके यांच्या नेतृत्वाखाली या बाजार समितीवर सत्तांतर झाले होते. सत्तेच्या सुरुवातीला बाबासाहेब तरटे आणि बापू शिर्के यांना संधी मिळाली होती, त्यानंतर किसन रासकर आणि किसन सुपेकर यांनी कार्यभार सांभाळला. आता तिसऱ्या टप्प्यात बेलकर आणि सालके यांच्याकडे ही धुरा सोपवण्यात आली आहे. निवडीची घोषणा होताच राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) आणि निलेश लंके प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी बाजार समितीच्या परिसरात फटाक्यांची आतिषबाजी करत आणि गुलालाची उधळण करत जल्लोष केला. यावेळी माजी सभापती बाबासाहेब तरटे, किसनराव रासकर, राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष अर्जुन भालेकर डॉ. बाळासाहेब कावरे, नगरसेवक योगीराज गाडे, रा. या. औटी, अशोक कटारिया, पद्मजा पठारे, छाया रोकडे, बाबासाहेब नर्हे, किसन सुपेकर, बापूसाहेब शिर्के, चंदन भळगट, अशोक कटारिया, विजय पवार, आबासाहेब खोडदे, सरपंच प्रकाश गाजरे, राष्ट्रवादीचे प्रवक्ते मोहनराव रोकडे, जितेश सरडे, सचिन पठारे, रवींद्र राजदेव, शहराध्यक्ष संदीप मते, रायभान औटी, शिवाजी बेलकर, उद्योजक संतोष गायखे, बाळासाहेब खिलारी, श्रीरंग रोकडे, रवींद्र गायखे, तुकाराम चव्हाण, संदीप चौधरी, भूषण शेलार, बाळासाहेब दिघे, पंकज बेलकर, चैतन्य बेलकर, ॲड. गणेश कावरे, लखन ठाणगे, गणेश गायखे, रामदास साळवे, प्रमोद गुगळे, शिवाजी भोसले, बाळासाहेब दाते, शांताराम बेलकर, अरुण बेलकर यांच्यासह सर्व संचालक उपस्थित होते.

# कवठे येमाईत मध्यरात्री थरार

## अज्ञातांकडून चारचाकीला आग वाहन जळून खाक




**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई :** शिरूरच्या पश्चिमेकडील कवठे येमाई गावठाणात मोहाचा आड रस्त्यानजीक मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात समाजकंटकांनी घरासमोर उभी असलेली चारचाकी गाडी पेट्रोल टाकून जाळल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या आगीत वाहनाचे मोठे नुकसान झाले असून परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, निलेश हनुमंत राजगुरू यांच्या मालकीची इको गाडी (क्र. चक१२ डझ २१७२) लक्ष्य करून हा प्रकार घडवण्यात आला.तत्पूर्वी यात्रेदरम्यान याच गाडीची मागील काच ही फोडण्यात आल्याची घटना घडली होती. घटनास्थळाजवळ पेट्रोलची बाटली आढळल्याने हा हल्ला पूर्वनियोजित असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.त्या परिसरात रस्त्याला सीसीटीव्ही नसल्याने कुठलाही धागादोरा उपलब्ध झाला नाही. रात्री दीडच्या सुमारास हा प्रकार घडला असल्याचे व गाडी पेटल्याचे लक्षात आल्याने व स्थानिकांनी आरडाओरड केल्याने जमा झालेल्या नागरिकांनी तात्काळ आग विझवली.घटनेची माहिती त्याच रात्री शिरूर पोलिसांना दिल्यानंतर ते तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. या घटनेत निलेश राजगुरू यांच्या गाडीचा आतील भाग,सीट,साउंड सिस्टम,काचा ही फुटल्या असून व इतर साहित्य जाळून खाक झाल्याने त्यांचे मोठे च आर्थिक नुकसान झाले आहे.

या प्रकरणी टाकळी हाजी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अज्ञात आरोपींचा शोध सुरू आहे. आरोपींना तत्काळ अटक करून कडक कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

## द•ख•ल

### अमृतानुभव पतसंस्थेतील कथित आर्थिक गैरव्यवहार, ठेवीदारांची पोलिसांत धाव

**आळंदी :** अमृतानुभव नागरी सहकारी पतसंस्थेमध्ये खातेदार व ठेवीदारांची मोठ्या प्रमाणावर आर्थिक फसवणूक झाल्याचा आरोप समोर आला असून, या प्रकरणी पीडितांनी आळंदी पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली आहे. या घटनेमुळे ठेवीदारांमध्ये चिंतेचे व संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. तक्रारीनुसार, संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी विविध योजनांच्या नावाखाली ठेवीदारांची दिशाभूल करून त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात रक्कम जमा करून घेतल्याचा आरोप आहे. मात्र, मुदत पूर्ण होऊनही रक्कम परत मिळत नसल्याने अनेक ठेवीदार आर्थिक अडचणीत सापडले आहेत. दरम्यान, पीडित खातेदार व ठेवीदारांनी एकत्र येत पोलिसांकडे धाव घेतली असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच अडकलेली रक्कम तातडीने परत मिळवून द्यावी, अशी म ागणी केली आहे. या प्रकरणामुळे शहरात चर्चे ला उधाण आले असून, संबंधित पतसंस्थेच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

### एप्रिल २०२६ मध्ये विशेष डिजिटल शेतीशाळा

**पुणे :** हवामानातील वाढती अनिश्चितता, पावसाचा खंड व नैसर्गिक आपत्तीमुळे कोरडवाहू शेतीसमोरील आव्हाने लक्षात घेऊन कृषी विभागामार्फत 'हवामान अनुकूल तंत्रज्ञान अभियान' राबविण्यात येत आहे. या अंतर्गत नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प व पाणी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने एप्रिल २०२६ मध्ये चार विशेष डिजिटल शेतीशाळांचे आयोजन करण्यात आले आहे.

या शेतीशाळांद्वारे पेरणीपूर्व तंत्रज्ञान, जैविक व नैसर्गिक निविष्ठा, एकात्मिक कीड व्यवस्थापन तसेच भात शेतीतील सुधारित तंत्रज्ञान याबाबत तज्ज्ञ मार्गदर्शन मिळणार आहे. या शेतीशाळेम ध्ये कृषी विद्यापीठे, कृषी विज्ञान केंद्रे व प्रगतशील शेतकरी यांचा सहभाग राहणार आहे.

या कार्यशाळेस शेतकरी, महिला बचत गट, शेतकरी उत्पादक कंपन्या, कृषी मंडळे तसेच इच्छुक नागरिकांनी या डिजिटल शेती शाळांमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी संजय काचोळे यांनी केले आहे.

### ज्योती गोरडे यांना स्वामी विवेकानंद युवा उद्योजक पुरस्कार जाहीर

**लोणी धामणी :** मांदळेवाडी (ता. आंबेगाव) येथील उद्योजिका ज्योती अरुण गोरडे यांना युगप्रवर्तक प्रतिष्ठान, घोडेगाव (ता. आंबेगाव) यांच्यातर्फे 'स्वामी विवेकानंद युवा उद्योजक' हा प्रतिष्ठेचा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाला आहे.



दिव्यांगांचे पुनर्वसन, तळागाळातील वंचित सम ाजाचे राहणीमान उंचावण्यासाठी केलेले भरीव कार्य, निराधार व विधवा महिलांना संजय गांधी योजनेचा लाभ मिळवून देणे, दिव्यांगांसाठी शस्त्रक्रिया, श्रावणबाळ योजना, डोळ्यांच्या शस्त्रक्रिया, दिव्यांगांना प्रमाणपत्रे व सवलतीचे पास उपलब्ध करून देणे, मानधन व बचत गटांसाठी काम करणे अशा विविध सामाजिक उपक्रमांत त्यांचा सक्रिय सहभाग आहे. तसेच आपल्या उद्योगाच्या माध्यम ातून त्यांनी आतापर्यंत ५०० पेक्षा अधिक महिलांना प्रशिक्षण दिले आहे. समाजासाठी निरपेक्ष भावनेने, कोणतीही अपेक्षा न ठेवता केलेल्या या कार्याची दखल घेत त्यांना हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. 'स्वामी विवेकानंद युवा उद्योजक' हा राज्यस्तरीय प्रतिष्ठेचा पुरस्कार देऊन युगप्रवर्तक प्रतिष्ठान, घोडेगाव यांनी माझा मोठा सन्मान केला आहे, अशी भावना ज्योती गोरडे यांनी व्यक्त केली.

### कवठे येमाईत पोस्टाच्या विविध योजनांवर मार्गदर्शन



**कवठे येमाई :** केंद्र सरकारच्या पोस्ट विभागाच्या विविध योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचावी या उद्देशाने शिरूर तालुक्यातील कवठे येमाई ग्रामपंचायत सभागृहात माहिती सत्राचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान सरपंच मनीषा पांडुरंग भोर यांनी भूषवले. या सत्रात पोस्टल जीवन विमा, अपघाती विमा, मेडिक्लेम, सुकन्या समृद्धी योजना तसेच आधार कार्ड अद्ययावत व नवीन नोंदणी प्रक्रिया याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. पुणे पोस्ट विभागाचे नामदेव गवळी यांनी योजनांचे फायदे, पात्रता व अर्ज प्रक्रिया स्पष्ट केली. कार्यक्रमास ग्राम महसूल अधिकारी शलाका भालेराव, अंगणवाडी सेविका तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. विशेषतः महिलांचा सहभाग लक्षणीय होता. या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये शासकीय योजनांबाबत जागरूकता वाढली असून, योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले.

## चास येथे महिला उद्योजिकांना
# एमएसडीपी प्रमाणपत्र वितरण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**निरगुडसर :** ग्रामीण महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने आयोजित २० दिवसीय सूक्ष्म कौशल्य उद्यमिता विकास (एम.एस.डी.पी) प्रशिक्षण कार्यक्रमाचा समारोप उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रम ात प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केलेल्या महिला उद्योजिकांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

अहमदाबादस्थित भारतीय उद्योजकता विकास संस्थान व ललशर्पीीश यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच उमेद अभियान व ग्रामपंचायत चास यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला. प्रशिक्षणादरम्यान महिलांना विविध प्रकारच्या तेलबियांपासून थंड दाब पद्धतीने शुद्ध तेल निर्मिती तसेच मसाला प्रक्रिया यांचे प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात आले. याशिवाय उत्पादनांना स्पर्धात्मक बाजारपेठ मिळावी यासाठी पॅकेजिंग, ब्रँडिंग आणि मार्केटिंग याबाबत तज्ज्ञ मार्गदर्शनही करण्यात आले. समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंचायत समितीच्या माजी सभापती व विद्यमान सदस्य उषाताई कानडे होत्या, तर प्रमुख पाहुण्या म्हणून सरपंच अर्चनाताई बारवे उपस्थित होत्या. यावेळी उपसरपंच मनिषा चासकर, कल्पवृक्ष फाउंडेशनचे प्रदीप चव्हाण, इ डी डी आय आयचे भगवान हरकळ व विकास गोफणे, ग्रामसेविका वैशाली गवारी, यशोगाथा ग्रामसंघाच्या अध्यक्षा संध्या चव्हाण, सचिव सोनल भोर, कोषाध्यक्ष सुवर्णा बारवे, प्रभाग संघाचे अध्यक्षा जयश्री दही तुले प्रशिक्षिका वैशाली खिल्लारी, ग्रामसखी सुप्रिया बारवे, ज्येष्ठ नागरिक संघाचे इनामदार, मारुती भोर, शंकर बारवे, चंद्रकांत बारवे, पूजा भोर, ज्योती भोर, सोनाली भोर, संध्या चव्हाण, रजनी मिरके ,शोभा बारवे,सुशीला घोडे, सुरेखा भोर, कोमल काळोखे,आदी उपस्थित होते. तसेच ग्रामस्थ व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांनी महिलांनी उद्योजकतेच्या माध्यमातून आत्मनिर्भर बनून कुटुंब व सम ाजाच्या प्रगतीत योगदान द्यावे, असे आवाहन केले. तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेऊन स्वउद्योग उभारण्याचेही मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुप्रिया बारवे यांनी केले, तर आभार प्रदर्शन संध्या सुभाष चव्हाण यांनी मानले. कार्यक्रम शिस्तबद्ध व उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या संपन्न झाला.


# पुणे मनपाने प्रशांत वाघमारे प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात दाद मागावी

## हायलाईट फोरमचे अध्यक्ष उमेश नाईक यांची मागणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**कवठे येमाई :** पुणे म हानगरपालिकेचे माजी शहर अभियंता प्रशांत वाघमारे यांच्याविरोधातील बेहिशेबी म ालमत्ता प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरोधात महानगरपालिकेने सर्वोच्च न्यायालयात दाद मागावी, अशी मागणी हायलाईट फोरमचे अध्यक्ष उमेश नाईक यांनी निवेदनाद्वारे केली आहे. याबाबत पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवल किशोर राम यांना दिलेल्या पत्रात नाईक यांनी नमूद केले आहे की, वाघम ारे यांच्यावरील आरोप गंभीर स्वरूपाचे असून त्यांची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे.उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतरही महानगरपालिकेने कायदेशीर पावले उचलून सर्वो च्च न्यायालयात अपील करावे, जेणेकरून प्रकरणाचा योग्य निकाल लागू शकेल.तसेच, वाघमारे यांच्यावरील आरोप निराधार असल्याचे सिद्ध करण्यासाठीही पारदर्शक चौकशी आवश्यक असल्याचे पत्रात म्हटले आहे. या संदर्भात महानगरपालिकेने तातडीने कारवाई करून न्यायालयीन प्रक्रियेत पुढाकार घ्यावा, अशी मागणी उमेश नाईक यांच्याकडून करण्यात आली आहे.



# माऊली मंदिराला सागवानी नवा पाणदरवाजा

## संकष्टीच्या मुहूर्तावर पूजन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आळंदी :** तीर्थक्षेत्र आळंदी येथील श्री ज्ञानेश्वर महाराज मंदिर येथे जुन्या पाणदरवाजाऐवजी अत्यंत देखणा व मजबूत असा शुद्ध सागवानी नवा पाणदरवाजा बसविण्यात आला आहे. श्री विश्वकर्मा पांचाळ सुतार समाज सेवा मंडळ यांच्या वतीने ही सेवा साकारण्यात आली असून, संकष्टी चतुर्थीचे औचित्य साधत दरवाजाचे शास्त्रोक्त पूजन करण्यात आले.

चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर (बल्लारशाह) येथून आणलेल्या सागवान लाकडापासून साकारलेल्या या पाणदरवाजासाठी सुमारे तीन महिन्यांचा कालावधी लागला असून, त्याची किंमत अंदाजे साडे सहा लाख रुपये आहे. दरवाजावरील सुबक नक्षीकाम भाविकांचे विशेष लक्ष वेधून घेत आहे.

या मंगल प्रसंगी देवस्थानचे विश्वस्त राजेंद्र उमाप, भावार्थ देखणे, चैतन्य महाराज लोंढे, पुरुषोत्तम म हाराज पाटील, व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर, नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे तसेच उपनगराध्यक्षा सुजाता तापकीर यांची प्रमुख उपस्थिती होती. याशिवाय नगरसेवक, नगरसेविका, ग्रामस्थ, मंडळाचे पदाधिकारी, कर्मचारी आणि मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

माऊलींच्या चरणी ही उत्कृष्ट लाकडी कलाकृती सेवा म्हणून अर्पण केल्याबद्दल मंडळाचे सर्वत्र कौतुक होत आहे. यावेळी पाणदरवाजा निर्मितीत योगदान देणाऱ्या कारागिरांचा सेवा सन्मान प्रमाणपत्र व माऊलींची प्रतिमा देऊन गौरव करण्यात आला.

श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थानने आम्हाला ही पवित्र सेवा करण्याची संधी दिली, याचा संपूर्ण समाजाला अभिमान आहे. आद्य संत भोजलिंग काका यांच्या परंपरेचा हा वारसा पुढे नेण्याचा हा प्रयत्न आहे, अशी भावना मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

# आंबेगावचा पश्चिम पट्टा : जैवविविधता आणि पर्यटनाचा खरा श्वास

**नवनाथ फलके | राष्ट्र सह्याद्री**

**डिंभे :** आंबेगाव तालुक्यातील पाश्चिम पट्टा निसर्गसंपन्न असून जैवविविधतेचा खजिना म्हणून ओळखला जातो. सह्याद्री पर्वतरांगांच्या सान्निध्यात असलेला हा परिसर डोंगर, दऱ्या, टेकड्या, पठार आणि गड-किल्ल्यांच्या नैसर्गिक सौंदर्याने नटलेला आहे. या भागाचे योग्य संवर्धन केले तर दर्जेदार पर्यटनस्थळ म्हणून विकसित होण्याची मोठी क्षमता आहे.

मात्र, विकासाच्या नावाखाली वाढत्या जंगलतोडीमुळे वनसंपदेवर गंभीर परिणाम होत आहे. भूभागावर किमान ३३ टक्के वनाच्छादन आवश्यक असताना ते सातत्याने घटत आहे. परिणामी पर्यावरणीय संतुलन बिघडत असून प्राणवायूचे प्रमाण कमी होत आहे. घोडेगाव वनपरिक्षेत्रात गेल्या काही वर्षांत करण्यात आलेले वृक्षारोपण आगीमुळे नष्ट झाले आहे. राज्यातही मोठ्या प्रमाणावर वनक्षेत्र आगीच्या घटनांमुळे बाधित झाले आहे.

तसेच, गौणखनिज उत्खननाम ुळे डोंगर-दऱ्यांची हानी होत असून जैवविविधतेला धोका निर्माण झाला आहे. अनेक ठिकाणी परवान्याशिवाय उत्खनन सुरू असल्याचे चित्र आहे. याउलट आदिवासी समाज निसर्ग संवर्धनासाठी प्रयत्नशील असून जंगलातील औषधी वनस्पती आणि वृक्षांचे जतन करताना दिसतो.

या परिसरात वड, पिंपळ, चिंच, फणस, आवळा, आंबा, बेल, कडूनिंब, मोह, कदंब, पळस, अर्जुन यांसारखे अनेक औषधी गुणधर्म असलेले वृक्ष आढळतात. मात्र परदेशी प्रजातींच्या झाडांच्या वाढत्या लागवडीमुळे स्थानिक जैवविविधतेवर परिणाम होत आहे.

पर्यावरण तज्ज्ञांच्या मते, देशी वृक्षांची लागवड, वनसंवर्धन आणि जैवविविधतेचे रक्षण ही काळाची गरज आहे. जंगल टिकून राहिल्यासच पक्षी, प्राणी, तसेच शेतीसाठी उपयुक्त घटक जसे मधमाश्या यांचे अस्तित्व सुरक्षित राहील. त्यामुळे वनविभागासह नागरिकांनीही सामूहिक जबाबदारी स्वीकारून निसर्ग संवर्धनासाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे.

# जारकरवाडी सोसायटीकडून पीककर्ज वाटप

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**




**लोणी धामणी :** जारकरवाडी येथील विकास सोसायटीने ४९५ सभासदांना पुणे जिल्हा बँकेमार्फत खरीप हंगामासाठी ४ कोटी १२ लाख ५० हजार ५०० रुपयांचे कर्ज वाटप केल्याची माहिती संस्थेचे चेअरमन खंडू भोजने व सचिव नवनाथ मंचरे यांनी दिली.

महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना' संदर्भातील परिपत्रक अद्याप विकास सोसायट्यांना प्राप्त झालेले नसल्यामुळे सभासद व कर्जदारांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. यामुळे संस्थेच्या वसुलीच्या टक्केवारीत मोठ्या प्रमाणात घट झाली आहे.

शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना'चे परिपत्रक लवकरात लवकर जाहीर करावे, अशी मागणी संस्थेचे चेअरमन खंडू भोजने व उपाध्यक्ष बाळासाहेब लबडे यांनी केली आहे.

माजी मंत्री आमदार दिलीप वळसे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हा बँकेचे विभागीय अधिकारी विष्णू गायकवाड व विकास अधिकारी के. आर. वाळुंज यांच्या प्रयत्नांतून सभासदांना खरीप हंगामासाठी जिल्हा बँकेमार्फत कर्ज वाटप करण्यात आले. यावेळी संस्थेचे आजी-म ाजी संचालक व कर्मचारी उपस्थित होते.

# खून व जबरी चोरी प्रकरणाचा छडा, दोन आरोपी अटकेत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वळती :** पुणे ग्रामीण पोलीसांच्या स्थानिक गुन्हे शाखा आणि मंचर पोलीस ठाण्याने संयुक्त कारवाई करत वयोवृद्ध व्यक्तीच्या खून व जबरी चोरीच्या गंभीर गुन्ह्याचा छडा लावत दोन आरोपींना अटक केली आहे. या कारवाईत खून, दरोडा व जबरी चोरीसह एकूण पाच गुन्हे उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले आहे.

मंचर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ८८/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम १०३(१), ३११, ३(५) अंतर्गत ३१ मार्च २०२६ रोजी दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात दामोदर जयराम मिंडे (वय ६२, रा. थोरांदळे पाईनमळा, ता. आंबेगाव) यांचा त्यांच्या शेतातील घरात झोपेत असताना अज्ञात चोरट्यांनी लोखंडी पहाराने डोक्यात वार करून खून केला होता. त्यानंतर सोन्याची अंगठी, रोख रक्कम व मोबाईल असा सुमारे २९ हजार रुपयांचा मुद्देमाल लुटून आरोपी फरार झाले होते.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल व अपर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू करण्यात आला. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने घटनास्थळी पाहणी करून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता दोन संशयितांचा सहभाग स्पष्ट झाला.

आरोपींनी मोटारसायकलचा वापर करून खोडद-बेल्हे मार्गे पारनेरकडे पलायन केल्याचे निष्पन्न झाले. यासाठी सुमारे ६० किलोमीटर परिसरातील १०० हून अधिक सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करण्यात आली.




गुप्त माहितीच्या आधारे पारनेर परिसरात सापळा रचून ५ एप्रिल रोजी कबीर उंबऱ्या काळे (वय २४, रा. पुणेवाडी, ता. पारनेर) व एका विधीसंघर्षित बालकाला ताब्यात घेण्यात आले.

चौकशीत आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली असून गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल जप्त करण्यात आली आहे.

आरोपी कबीर काळे हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर यापूर्वी नऊ गंभीर गुन्हे दाखल आहेत. न्यायालयाने त्याला ११ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. पुढील तपासात ओतूर, घोडेगाव, मंचर व नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी येथे घडलेले आणखी चार गुन्हे उघडकीस आले आहेत.

ही कारवाई पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर, श्रीकांत कंकाळ व त्यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडले.

# संधीचे सोने करण्याचा पोलिसांचा प्रयत्न फसला


## तब्बल ५ लाखाचा मुद्देमाल नष्ट, १२ तासांनंतर गुन्हा दाखल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा:** तालुक्यातील वांगदरी गावच्या डोमाळवाडी परिसरात, गजोबा मंदिरासमोर घोडनदीकाठी अवैध हातभट्टी दारू निर्मितीवर अहिल्यानगर स्थानिक गुन्हे अन्वेषण पथकने ८ एप्रिल रोजी सायंकाळी ९ वाजता छापा टाकत मोठी कारवाई केली. या कारवाईत सुमारे ४,९८,००० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून त्यातील दारू व साहित्य घटनास्थळीच नष्ट करण्यात आले. असून या प्रकरणी श्रीगोंदा पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि. नं. ३०६/२०२६ अंतर्गत महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम ६५ (फ)(क)(ड)(इ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.मात्र १२तासानंतर गुन्हा दाखल झाल्याने अनेक शंका उपस्थित केल्या जात आहेत.

श्रीगोंदा पोलीस ठाण्याच्या हद्दीमधील मदनेवाडीडोंबाळवाडी (वांगदरी परिसर) येथील घोडनदीकाठी गजोबा मंदिरासमोर अवैध हातभट्टी दारू निर्मितीवर सुरवातीला श्रीगोंदा पोलिसांनी कारवाई केली त्यानंतर १३ फेब्रुवारी रोजी राज्य उत्पादन शुल्क विभागाने कारवाई केल त्यानंतर लगेचच पुन्हा अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई करत लाखो रुपयांचा मुद्देमाल लंपास करण्यात आला आहे ही कारवाई पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या आदेशानुसार पोउपनिरीक्षक अनंत सालगुडे व पथकाने गुप्त माहितीच्या आधारे राबवलीयामध्ये फिर्यादी : अमोल श्रीरंग आजबे (पो.कॉ. ११९१), स्थानिक गुन्हे शाखा, अहिल्यानगर यांच्या फिर्यादीवरून आरोपी अली उर्फ अल्ताफ नुरमोहम्मद आत्तार (वय ३५, रा. काष्टी),सोमनाथ उर्फ संदीप पोपट कांबळे (वय २३, रा. लोणी काळभोर, जि. पुणे) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे हि कारवाई गुप्त माहितीच्या आधारे पथकाने घटनास्थळी छापा टाकून आरोपींना ताब्यात घेतले. पंचनाम्यात मोठ्या प्रमाणावर तयार गावठी दारू, कच्चे रसायन, ड्रम, टाक्या, गुळाचा साठा आणि महिंद्रा पिकअप (MH 12 XM 0509) जप्त करण्यात आली. मिळालेला एकूण मुद्देमाल : ४,९८,००० नष्ट करण्यात आला आहे कारवाईनंतर गुन्हा नोंदविण्यास झालेला सुमारे १२ तासांचा विलंब चर्चेचा विषय ठरला आहे.एकूणच कारवाईने अवैध धंद्यावर मोठा घाव बसला, पण 'विलंब' हा शब्दच आता अंगलट येण्याची शक्यता नाकारता येत नाही कारण कायद्याचा वेग जर सुसंगत नसेल, तर संशयच वेगाने पसरतो आणि सध्या तेच चित्र दिसते! त्यामुळे मोठा गैरसमज पसरला आहे फिर्यादीत विलंबाचे कारण निरंक असे नोंदीत नमूद असतानाही नागरिकांकडून शंका उपस्थित होत आहेत कारवाई तत्पर, पण गुन्हा नोंदण्यात विलंब का? या काळात काही 'सेटिंग' तर झाली नाही ना?अशा चर्चा रंगू लागल्या आहेत.या प्रकरणाचा तपास पोसई भगवान गांगर्डे करीत असून, प्रभारी अधिकारी म्हणून पो. नि. किरण शिंदे काम पाहत आहेत. दाखल अंमलदार म्हणून डी.व्ही. भागवत यांनी कामकाज हाताळले आहे.

## निमगाव वाघात रविवारी बिरोबा महाराज यात्रोत्सव



**अहिल्यानगर :** निमगाव वाघा (ता. नगर) येथील ग्रामदैवत श्री बिरोबा महाराजांच्या यात्रा उत्सवानिमित्त रविवारी (दि.१२ एप्रिल) विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तर सोमवारी संध्याकाळी करिमशहा वली बाबांचा संदल-उरुस होणार आहे. सरपंच उज्वलाताई कापसे यांच्या नुकतेच झालेल्या अपघाती निधनाने बैलगाडा शर्यत व सांस्कृतिक कार्यक्रम रद्द करण्यात आले असून, गावामध्ये दु:खाचे सावट असल्याने दोन्ही उत्सव साध्या पध्दतीने होणार असल्याची माहिती ग्रामपंचायत सदस्य तथा सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे यांनी दिली.

नुकतेच गावातील युवकांनी गंगाजल आणण्यासाठी बुधवारी (दि.८ एप्रिल) रात्री पारंपारिक वाद्यांसह मिरवणूकीने कावड घेऊन प्रवरा संगमकडे प्रस्थान केले. यावेळी श्री बिरोबा मंदिर परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानात पै. नाना डोंगरे, देवाचे भगत नामदेव भुसारे, बाबा जाधव, बबन कापसे सहभागी झाले होते.

गावातील युवकांचा जथ्था कावडी घेवून रविवारी यात्रेच्या दिवशी सकाळी ८ वा. गावात परतणार असून, कावडीची गावामधून डफ, ढोल, ताशे व लेझीम पथकासह मिरवणूक काढली जाणार आहे. सकाळी १० वाजता श्रीबिरोबा महाराजांच्या मूर्तीस गंगाजलाने अभिषेक घालून विधीवत पूजा केली जाणार आहे.

# करंजी घाटात ट्रकला अपघात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**करंजी :** नगर ते पाथर्डी महामार्गावरील करंजी घाटात आज सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास भंगार मटेरियल घेऊन जाणाऱ्या ट्रकचे ब्रेक निकामी झाल्याने ट्रक पलटी झाला. सुदैवाने या अपघातात कोणतीही जिवीतहानी झाली नाही. मात्र ट्रकमधील मोठ-मोठे लोखंडी पाईप रस्त्यावर आडवे झाल्याने सुमारे एक तास वाहतुकीची कोंडी झाली होती.

नगर ते पाथर्डी महामार्गावरील करंजी घाटात आज सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास पुण्यावरुन जालना येथे मोठ-मोठे चौकोनी पाईप घेऊन जात असलेल्या ट्रकचे (न. एम एच २४ ए यु-३५९०) ब्रेक करंजी घाटात निकामी झाल्याने ट्रक घाटाच्याकडेला पलटी झाला. या ट्रकमधील चौकोनी लोखंडी पाईप मात्र रस्त्यावर आल्याने या महामार्गावरील वाहतुक सुमारे एक तास खोळंबली होती. या अपघातात ट्रक चालक दत्तात्रय हरिभाऊ बांगर (रा. कासारी, ता. केज, जि. बीड) याने ट्रकचे ब्रेक निकामी होऊनही प्रसंगावधान दाखविले. ट्रक घाटाच्याकडेला खड्ड्यात जाऊन पलटी झाला. या अपघातात सुदैवाने कोणतीही जिवीतहानी झाली नाही. अपघाताची माहिती मिळताच महामार्गावर पोलिस घटनास्थळी दाखल झाले. या दरम्यान एक तास वाहतुकीची कोंडी झाली होती. महामार्ग पोलिसांनी वाहतुक सुरळीत केली.पोकॉ.जालिंदर पालवे, महेश सावंत,अमोल पौंधे ,संतोष टेकाळे तसेच दगडवाडी येथील सौरभ शिंदे,योगेश शिदे,अनिकेत पवार,अभिजित शिंदे आदिंनी या कामी सहकार्य केले.

# हिंगणगाव-ने देवस्थानाकरीता स्वखर्चातून 'हायमॅक्स' दिवा कार्यान्वित

## ग्रामस्थांच्या मागणीवर हर्षदा काकडेंची तात्काळ दखल



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव :** तालुक्यातील हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या हिंगणगाव-ने येथील श्री ॐ चैतन्य अडभंगनाथ देवस्थान येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही वार्षिक यात्रेला उत्साहात प्रारंभ झाला असून परिसरात धार्मिक वातावरण निर्माण झाले आहे. यात्रेनिमित्त जिल्हाभरातुन भाविक मोठ्या संख्येने येथे दाखल होत असून विशेषतः रात्रीच्या वेळेस मंदिर परिसरात मोठी गर्दी होत असुन ग्रामस्थांशी संवाद साधताना मंदिर परिसरात अपुरी प्रकाशयोजना असल्याने भाविकांच्या सोयीसाठी 'हायमॅक्स दिव्या'ची तातडीची आवश्यकता असल्याचे ग्रामस्थांनी जिल्हा परिषदेच्या माजी सभापती हर्षदा काकडे यांच्या निदर्शनास आणून दिले.त्यावर त्यांनी तत्काळ होकार देत स्व-खर्चातून 'हायमॅक्स दिवा' बसविण्यात आला आहे.यांमुळे भाविकांतून समाधान व्यक्त होत आहे.

ग्रामस्थांनी या उपक्रमाचे स्वागत करत समाधान व्यक्त केले असून सौ. काकडेंचे आभार मानले आहेत. यात्रेनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम, भजन आदींचे आयोजनही करण्यात आले असून भाविक मोठ्या भक्तिभावाने यात सहभागी होत आहेत.या प्रसंगी कल्याण कमानदार, जनार्धन वाबळे, शिवसेनेचे शाखाध्यक्ष धनंजय काकडे, सरपंच सतीश पवार, संजय पवार, ग्रामसेवक डौले भाऊसाहेब, सार्थक पवार, रोहित ढवळे, अभिषेक पवार, ओम पवार, गणेश ढवळे, दत्ता पवार, राहुल पवार, स्वप्नील वाबळे, यशवंत पवार, योगेश काकडे, दिगंबर पवार सर , डॉ.सुभाष खर्चन ,सुभाष आहेर, हनुमान ढवळे, अनिरुद्ध पवार, नितीन पवार, गणेश बामदळे, डॉ.भास्कर पवार, आदिसह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

चौकट : 'श्रद्धा आणि भक्तीच्या या सोहळ्यात कोणत्याही प्रकारचा अडथळा येऊ नये, या भावनेतून तत्काळ या मागणीची दखल घेत देवस्थान करिता 'हायमॅक्स' दिवा देण्याचा निर्णय घेतला. मंदिर परिसर प्रकाशमय झाल्याचे समाधान आणि ग्रामस्थांच्या चेहऱ्यावरील आनंद हीच माझी खरी कमाई असून यांमुळे सामाजिक कार्याचे बळ मिळत असुन भविष्यातही देवस्थान परिसरात सामाजिक व धार्मिक सुविधा सुधारण्याचा प्रयत्न सुरू राहणार आहे

# बापट पतसंस्था मधील कर्जदार व संचालकांच्या मालमत्ता जप्त, बँक खाते सील करा : विनोद गोळे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पारनेर :** सेनापती बापट मल्टीस्टेट पतसंस्थेच्या ठेवीदारांना न्याय देण्यासाठी तातडीने थकीत कर्जदार व अध्यक्ष रामदास भोसले यांच्या सह संचालक मंडळाच्या व नातेवाईक यांच्या मालमत्ता जप्त करा, बँक खाते सील करा अशी मागणी शिवराय सामाजिक प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य चे अध्यक्ष विनोद गोळे यांनी जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे व आर्थिक गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांकडे कडे केली आहे.

पारनेर चे तीन वेळा आमदार व विधानसभा उपाध्यक्ष भूषवलेले विजय भास्कर औटी संस्थापक असलेल्या व शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख ठाकरे गटाचे रामदास भोसले अध्यक्ष असलेल्या सेनापती बापट मल्टीस्टेट पतसंस्थेच्या ठेवीदारांना गेल्या दोन वर्षांपासून ठेवी मिळत नसल्याने ठेवीदारांनी न्यायालयात, पोलिस ठाण्यात, आंदोलन व्दारे सगळे दरवाजे ठोठावत आहे. भाजीपाला विक्री करणारे, शेतमजूर यांच्या पासून तर नोकरदारांपर्यंत सुमारे १०० ते १५० कोटींच्या ठेवी अडकल्या आहेत. अनेक कर्जदार मोठ्या प्रमाणावर थकीत कर्ज ठेवून व संचालक मंडळ उजळ माथ्याने फिरत आहे.या सर्वांवर कारवाई करावी,त्यांचे व नातेवाईक यांचे बँक खाते सील करावे,स्थावर मालमत्ता जप्त करावी अशी मागणी केली आहे.

दरम्यान, सेनापती बापट पतसंस्था चे मोठा कर्जदार महेंद्र साईनाथ मंडलिक याला आर्थिक गुन्हे शाखेने अटक केली ही कारवाई स्वागतार्ह आहे.

आपण पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे व पोलीस उपअधीक्षक गणेश उगले, पोलिस निरीक्षक शरद गोर्डे, सपोनी युवराज आठरे व पोलीसांचा सत्कार करणार आहोत. त्यांची धाडसी कारवाई सुरू रहावी अशी मागणी करण्यात येणार आहे.

# शाळांची पटपडताळणी पुढे ढकलण्याची शिक्षक सेनेची मागणी

**अहिल्यानगर :** राज्यातील शाळांची पटपडताळणी प्रक्रिया पुढे ढकलावी अथवा पूर्णपणे रद्द करण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक व शिक्षकेतर सेनेच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात शिक्षक सेनेचे जिल्हाध्यक्ष प्रसाद शिंदे यांनी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शालेय शिक्षण मंत्र्यांना निवेदन पाठवले आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, राज्यातील शाळांमध्ये दि. ११, १५ आणि २२ एप्रिल २०२६ रोजी पटपडताळणी आयोजित करण्यात आली आहे. मात्र, याच कालावधीत इयत्ता २री इयत्ता ९ वी व ११ वीच्या परीक्षा सुरू असून इतर शैक्षणिक उपक्रमही सुरू आहेत. त्यामुळे शाळांच्या नियमित शैक्षणिक कामकाजावर याचा प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

राज्यातील बहुतांश शाळांनी त्यांच्या परीक्षांचे वेळापत्रक आधीच निश्चित केले असून काही ठिकाणी पुढील इयत्तांसाठी जादा तासांचे नियोजनही करण्यात आले आहे.

अशा परिस्थितीत अचानक येणाऱ्या पटपडताळणीमुळे शाळांच्या नियोजनात अडथळे निर्माण होत असल्याची बाब शिक्षक सेनेने स्पष्ट केले आहे. या सर्व कामांमुळे शिक्षक आधीच व्यस्त असून, त्यात पटपडताळणीची भर पडल्यास अडचणी वाढणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

## बेकायदेशीर ई-फार्मसीवर कारवाईची मागणी

# औषध वितरण व्यवस्थेच्या संरक्षणावर भर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** द ऑल इंडिया ऑर्गनायझेशन ऑफ केमिस्टस् एड ड्रगिस्टस् (एआयओसीडी) यांनी १६ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या ९३व्या ड्रग टेक्निकल डव्हायझरी बोर्ड (डीटीएबी) बैठकीतील महत्त्वाच्या अजेंडा मुद्द्यांवर (२, ५, ७, ९ आणि १२) सविस्तर निवेदन सादर केले असल्याची माहिती केमिस्टस् असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष दत्ता गाडळकर व सचिव आबासाहेब बेद्रे यांनी दिली.

एआयओसीडीचे अध्यक्ष जगन्नाथ शिंदे आणि महासचिव राजीव सिंगल यांनी संयुक्तरित्या सादर केलेल्या निवेदनात सार्वजनिक आरोग्य, औषधांचा योग्य व विवेकी वापर आणि नियमनबद्ध औषध वितरण प्रणालीच्या संरक्षणासाठी संघटनेची कटिबद्धता अधोरेखित करण्यात आली आहे. तसेच बेकायदेशीर व अनियंत्रित फार्मसीच्या वाढत्या प्रमाणाबाबत गंभीर चिंता व्यक्त करत, यामुळे रुग्णांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होत असल्याचे नमूद करण्यात आले आहे.



महत्त्वाच्या प्रस्तावांवर संघटनेने भूमिका मांडली आहे. यामध्ये गुड डिस्ट्रिब्युशन प्रॅक्टिसेस (जीडीपी): एआयओसीडीने या प्रस्तावाचे स्वागत केले असले, तरी तो टप्प्याटप्प्याने आणि व्यवहार्य पद्धतीने लागू करण्याची मागणी केली आहे. लहान व मध्यम औषध विक्रेत्यांवर कोणताही अतिरिक्त आर्थिक किंवा प्रशासकीय भार पडू नये, यावर संघटनेने विशेष भर दिला आहे.

शेड्युल एच, एच १, आणि एक्स औषधांच्या जाहिराती: या प्रस्तावाला एआयओसीडीने कडाडून विरोध दर्शविला आहे. अशा जाहिरातींमुळे स्वमर्जीने औषध सेवन (सेल्फ मेडिटेशन), औषधांचा गैरवापर आणि प्रिस्क्रिप्शन औषधांचे व्यापारीकरण वाढण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे सध्याची जाहिरातबंदी कायम ठेवावी, अशी भूमिका मांडण्यात आली आहे.

रुल ६४ मधील दुरुस्ती (सक्षम व्यक्ती): सुचविण्यात आलेले बदल अव्यवहार्य असल्याचे सांगत विशेषतः घाऊक विक्रेत्यांसाठी ते अडचणीचे ठरतील, असा दावा करण्यात आला आहे. या बदलांचा पुरवठा साखळीवर नकारात्मक परिणाम होऊ शकतो, असेही नमूद करण्यात आले.

निकोटीन गम २ एमजी साठी शेड्युल के सवलत: निकोटीनच्या व्यसनाधीन स्वरूपामुळे या प्रस्तावाला तीव्र विरोध करण्यात आला आहे. अशा उत्पादनांची विक्री परवानाधारक औषध विक्रेत्यांच्या देखरेखीखालीच व्हावी, अशी शिफारस संघटनेने केली आहे.

होमिओपॅथिक औषधांचा साठा: या प्रस्तावाचे स्वागत करण्यात आले असून, योग्य नोंदी ठेवण्यावर भर देण्यात आला आहे. तसेच अतिरिक्त नियमांचे ओझे टाळावे आणि बेकायदेशीर ई-फार्मसीकडून होणाऱ्या गैरवापराबाबत सावधगिरी बाळगावी, असे मत व्यक्त करण्यात आले.

एआयओसीडीने बेकायदेशीर ई-फार्मसीविरुद्ध तातडीने कठोर कारवाई करण्याची मागणी पुन्हा अधोरेखित केली आहे. यासोबतच जीएसआर ८१७ आणि जीएसआर २२० या मसुदा तरतुदी त्वरित मागे घेण्याची मागणी करण्यात आली आहे. या तरतुदींमुळे नियामक अस्पष्टता निर्माण होऊन गैरवापराला वाव मिळू शकतो, अशी भीती संघटनेने व्यक्त केली आहे.

डीटीएबीसमोर मांडलेल्या प्रमुख मागण्यांमध्ये एआयओसीडीने डीटीएबीला अजेंडा क्रमांक ५, ७ आणि ९ मधील प्रस्ताव नाकारण्याची विनंती केली आहे. तसेच अजेंडा २ हा सर्व भागधारकांच्या सल्लामसलतीने टप्प्याटप्प्याने लागू करावा आणि अजेंडा १२ संतुलित पद्धतीने लवकरात लवकर अंमलात आणावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

सार्वजनिक आरोग्याचे संरक्षण आणि नियमनबद्ध औषध वितरण व्यवस्था टिकवणे हेच सर्वोच्च प्राधान्य असून, त्यासाठी कोणत्याही तडजोडीला वाव दिला जाणार नसल्याचेही संघटनेने स्पष्ट केले आहे.

## द•ख•ल


### घोसपुरी वयोवृद्ध व्यक्तीचा सत्कार सोहळ्याचे आयोजन

**अहिल्यानगर :** ज्येष्ठ नागरिकांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी घोसपुरी (ता.नगर) येथे शुक्रवारी (ता. १७) सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. निस्वार्थ निरपेक्ष कीर्तन प्रवचन समाज प्रबोधनकार ह.भ.प. राजाभाऊ झरेकर यांच्या पुढाकारातून हा सोहळा होत आहे.

घोसपुरी गावातील खामदरा रस्त्यावरील झरेकर वस्ती येथे शुक्रवारी (ता.१७) सायंकाळी ७ वाजता हा सोहळा होणार आहे.

निस्वार्थ निरपेक्ष सेवा करणारे ह . भ. प. राजाभाऊ झरेकर महाराज संपूर्ण महाराष्ट्रभर त्यांच्या कार्यासाठी प्रसिद्ध आहेत.त्यांनी आपल्या मातोश्रीच्या शेऊबाई झरेकर यांच्या ७५ अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त गावातील सर्व ७० वर्षापुढील ज्येष्ठ - वयोवृद्ध व्यक्तींचा सत्कार समारंभ आयोजित केला आहे. ह भ प निजामभाई शेख आणि सहकाऱ्यांचा अद्वैत तत्वज्ञानावरील भेदिकाचा कार्यक्रम सायंकाळी ७ ते ९ यावेळेत होणार आहे. त्यानंतर गावातील सर्व ज्येष्ठांचा सत्कार सोहळ होणार आहे. त्यानंतर महाप्रसादाने सोहळ्याची सांगता होणार आहे.

### स्मशानभूमीवरील अतिक्रमणाविरोधात रिपब्लिकन सेनेचे आमरण उपोषण



**अहिल्यानगर :** जामखेड तालुक्यातील मौजे कवडगाव येथे मागासवर्गीय समाजाच्या समशानभूमीवर अतिक्रमण झाल्याचा आरोप करत रिपब्लिकन सेनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे. संबंधित अतिक्रमण तात्काळ हटवून दोषींवर ट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी आंदोलकांनी केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मौजे कवडगाव येथील जुना सर्वे क्रमांक १२२ याचे एकत्रीकरण होऊन नवीन गट क्रमांक ३६६/१/२ मध्ये सुमारे दोन एकर क्षेत्र नदी व ओढ्याच्या काठी असून, यापैकी सुमारे ८० आर जागा मागासवर्गीय समाजाच्या समशानभूमीसाठी पिढ्यान् पिढ्या वापरात आहे. सन १९७० पासून या जागेची नोंद उताऱ्यावर असल्याचे सांगण्यात आले आहे. या ठिकाणी आजवर समाजातील मृत व्यक्तींचे अंतिम संस्कार होत आले आहेत. या समशानभूमीला लागून असलेल्या जमिनीचे मालक महादेव रामचंद्र शेंडगे यांनी समशानभूमीच्या जागेत अतिक्रमण करून ऊस लागवड केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. याला विरोध केल्यामुळे शेंडगे कुटुंबाकडून दमदाटी व जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या जात असल्याचा आरोप आढाव कुटुंबीयांनी केला असून त्यांच्या जीवितास धोका निर्माण झाल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

### दिव्यांग महिलेच्या ९ वर्षांच्या संघर्षाला न्याय; उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण आदेश

**अहिल्यानगर :** दिव्यांग कायद्यांतर्गत हक्काची जागा मिळवण्यासाठी तब्बल ९ वर्षे सातत्याने संघर्ष करणाऱ्या जबीन फारुक शेख या दिव्यांग महिलेला अखेर न्याय मिळाला आहे. मुंबई उच्च न्यायालय यांच्या औरंगाबाद खंडपीठाने त्यांच्या बाजूने निकाल देत सावेडी येथील २०० चौ.फुट जागा देण्याचे आदेश दिले आहेत.

जबीन शेख या अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील माळीवाडा परिसरातील रहिवासी असून त्या दिव्यांग आहेत. उपजीविकेसाठी कोणतेही साधन नसल्याने त्यांनी स्वतःचा छोटा टी-स्टॉल व्यवसाय सुरू करण्याचा निर्धार केला होता. मात्र, स्वतःच्या मालकीची जागा नसल्यामुळे त्यांचे हे स्वप्न वर्षानुवर्षे अपूर्णच राहिले. यासाठी त्यांनी सन २०१९ मध्ये मुंबई उच्च न्यायालय (औरंगाबाद खंडपीठ) येथे रिट पिटीशन क्रमांक १२४९८/२०१९ दाखल केली होती. शासनाच्या जीआरनुसार दिव्यांग व्यक्तींना उपजीविकेसाठी २०० चौ.फुट जागा उपलब्ध करून देण्याची तरतूद असल्याचा मुद्दा त्यांनी न्यायालयासमोर मांडला होता.

### लिंपणगावचे शेतकरी कुकडीच्या आवर्तनापासून वंचित, शेतकरी संतप्त!

**लिंपणगाव :** श्रीगोंदा तालुक्यातील लिंपणगाव येथील कुकडी लाभक्षेत्रातीलतकऱ्यांना कुकडीचे उन्हाळी हंगामातील दुसरे आवर्तन न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांमधून मोठा संताप व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान विसापूर सिंचन अंतर्गत १३२ मायनर कालव्यावरील लिंपणगावच्या शेतकऱ्यांना किसान पाणी वापर संस्थेने पाण्याची रीतसर पाणी मागणी करूनही येथील शेतकऱ्यांना कुकडीच्या संबंधित अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक वंचित ठेवल्याने शेतकऱ्यांनी आता कुकडीच्या या निष्क्रिय अधिकाऱ्यांच्या विरोधात वंचित शेतकऱ्यांनी आक्रमक पवित्र घेतला आहे. दरम्यान शेतकरी अशोक वाल्हेकर यांनी पत्रकारांना अधिक माहिती देताना म्हटले आहे की, उन्हाळी हंगामाचे कुकडीचे दुसरे आवर्तन १३२ मायनर मधून सोडण्यात आले. परंतु या कालव्यावरील नेमणुकीस असलेले सहाय्यक अभियंता व दप्तर कारकून यांनी फक्त चारी ओली करून कुकडीचे पाणी पुन्हा बंद केले. त्यामुळे आमचे पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.वाल्हेकर यांनी पुढे म्हटले आहे की, कुकडीचे उन्हाळी हंगामाचे दुसऱ्या आवर्तन आमच्यासाठी फार महत्त्वाचे होते. शेतकऱ्यांनी उन्हाळी कांदा, भुईमूग, खोडवा ऊस, जनावरांचा चारा फळबागा इत्यादी पिके पाण्याअभावी जळून चालले आहेत.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

शुक्रवार, दि.१० एप्रिल २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८


# निळवंडे व भंडारदरा परिसरातही पर्यटन केंद्र विकसीत करु

## रोजगार निर्मिती करण्यावर भर देण्यात येणार : ना. विखे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : पर्यटनाला वाव देण्यासाठी जलसंपदा विभागाने धरण परिसरात पर्यटन विकासाला प्राधान्य दिले असून, यासाठी विभागाचे कामही सुरु झाले आहे. जायकवाडी, माजलगाव, इसापुर या धरणांसह जिल्ह्यातील निळवंडे आणि भंडारदरा परिसरातही पर्यटन केंद्र विकसीत करुन, रोजगार निर्मिती करण्यावर भर देण्यात येणार असल्याची माहीती जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. शिर्डी अंतरराष्ट्रीय विमानतळावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मंत्री विखे पाटील यांनी स्वागत केले. याप्रसंगी पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजा मुंडे, माजी मंत्री आ.धनंजय मुंडे उपस्थित होते.

यानंतर माध्यमांशी संवाद साधताना जलसंपदा विभागाच्या वतीने धरण पर्यटनाच्या संदर्भात घेतलेल्या धोरणाबाबत माहीती देताना मंत्री विखे पाटील म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकारने धरण परिसरामध्ये असलेल्या जलसंपदा विभागाच्या जागांचा उपयोग पर्यटन विकास केंद्रासाठी केला जाणार आहे. यासाठी एक धोरण निश्चित करण्यात आले असून, बहुराष्ट्रीय कंपन्या यासाठी सल्लागार म्हणून काम करणार आहेत. राज्यात प्राधान्याने जायकवाडी, इसापूर, माजलगाव आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील निळवंडे आणि भंडारदरा परिसरातही हे पर्यटन धोरण विकसीत करण्याचा आपला प्रयत्न असून, गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाच्या माध्यमातून पर्यटन विकासाचे काम सुरु करण्यात आले आहे.

महामंडळाला आर्थिक स्त्रोत निर्माण व्हावेत तसेच रोजगाराची निर्मिती



करण्याचा उद्देश यामध्ये असल्याचे स्पष्ट करुन, मंत्री विखे पाटील म्हणाले की, नवीन धोरणानूसार वॉटर स्पोर्ट, रिसोर्ट उभारुन पर्यटक आकर्षित होतील अशा पध्दतीचे नियोजनही या धोरणामध्ये असल्याचे ते म्हणाले.

# रोड रॉबरी प्रकरणी तीन आरोपी जेरबंद

## शनिशिंगणापूर पोलिसांची कारवाई



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोनई** : संभाजीनगर–अहिल्यानगर महामार्गावर झालेल्या रोड रॉबरी प्रकरणात शनिशिंगणापूर पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली आहे. ही कारवाई ८ एप्रिल २०२६ रोजी करण्यात आली. मिळालेल्या माहितीनुसार, ३० मार्च २०२६ रोजी सायंकाळी साडेचारच्या सुमारास खरवंडी शिवारातील हॉटेल श्रेयससमोर ही घटना घडली होती. मच्छिंद्र रामराव डिघोळे (रा. निंभोरा, ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर) हे पुणे येथे भाजीपाला विक्री करून परत जात असताना, तीन अनोळखी आरोपींनी त्यांच्या चारचाकी वाहनाला आडवे वाहन लावून अडवले. त्यानंतर आरोपींनी शिवीगाळ करत लोखंडी पाईपने डिघोळे व त्यांच्या चालकाला मारहाण केली. तसेच वाहनाचे नुकसान करून त्यांच्या ताब्यातील ४२ हजार रुपये रोख रक्कम जबरदस्तीने हिसकावून आरोपी फरार झाले होते. या प्रकरणी शनिशिंगणापूर पोलीस ठाण्यात बीएनएस कलम ३०९ (६) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी तपास करत तांत्रिक व मानवी कौशल्याच्या आधारे आरोपींचा शोध घेत त्यांना अटक केली. आरोपींना न्यायालयीन कोठडीत पाठविण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे व उपविभागीय पोलीस अधिकारी नीरज राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी अधिकारी आशिष शेळके व त्यांच्या पथकाने केली.

# शनिशिंगणापूर ॲप गैरव्यवहार प्रकरणी ४ मे रोजी सुनावणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोनई** : श्री क्षेत्र शनिशिंगणापूर येथील प घोटाळा व इतर गैरव्यवहार प्रकरणाची चौकशी ईडी व सीबीआयमार्फत करण्यात यावी, या मागणीसंदर्भातील याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठात ४ मे रोजी पुढील सुनावणी होणार आहे. सामाजिक कार्यकर्ते सचिन प्रभाकर दरंदले यांनी ही माहिती दिली. या प्रकरणी यापूर्वी ३० मार्च रोजी सुनावणी अपेक्षित होती, मात्र न्यायालयीन कामकाज न झाल्याने सुनावणी पुढे ढकलण्यात आली. दरम्यान, नेवासा येथील आमदार विठ्ठलराव लंघे व आष्टीचे आमदार सुरेश धस यांनीही विधानसभेत या प्रकरणाकडे लक्ष वेधले होते.

त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबंधित विभागाला तातडीने तपासाचे आदेश दिले असून गुन्हाही दाखल करण्यात आला आहे. याचिकेत बनावट पावत्या, क्यूआर कोड गैरव्यवहार, बोगस देणगी पावती पुस्तके, दान संकलनातील अनियमितता तसेच अतिरिक्त कर्मचारी भरती आदी मुद्द्यांची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. मागील १५ वर्षांच्या व्यवहारांचे केंद्रीय लेखापरीक्षकांमार्फत ऑडिट करण्याचीही मागणी करण्यात आली आहे. या प्रकरणात दोन कर्मचाऱ्यांना अटक करण्यात आली असून सुमारे ७७ लाखांच्या गैरव्यवहाराचा आरोप आहे. सात जणांविरुद्ध दोषारोप दाखल करण्यात आले आहेत. दरम्यान, याचिकेसाठी सचिन दरंदले यांनी न्यायालयात पाच लाख रुपयांची अनामत रक्कम जमा केली आहे. या प्रकरणाकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# तडीपार असताना, स्थानिक भागात वास्तव्य घोडेगावातील सराईतांवर दोन वर्षांची हद्दपारी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोनई** : घोडेगाव( ता. नेवासा )येथील रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार शाहरुख उर्फ चाट्या जावेद शेख (वय २७) याच्यावर सोनई पोलिसांनी मोठी कारवाई करत त्याला दोन वर्षांसाठी अहिल्यानगर जिल्ह्यातून हद्दपार करून संभाजीनगर जिल्ह्यातील गंगापूर येथे नातेवाईकांकडे सुपूर्त केले आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित आरोपीवर सोनई पोलीस ठाण्यासह जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये मारामारी, गंभीर दुखापत, खंडणी, विनयभंग, अवैध शस्त्र बाळगणे, दरोडा, दरोड्याची तयारी तसेच जमावबंदी आदेशाचे उल्लंघन अशा गंभीर स्वरूपाचे एकूण १२ गुन्हे दाखल आहेत.

वारंवार प्रतिबंधक कारवाई करूनही त्याच्या वर्तनात कोणताही सुधार दिसून न आल्याने सोनई पोलिसांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ५६ अन्वये उपविभागीय दंडाधिकारी, अहिल्यानगर यांच्याकडे हद्दपारीचा प्रस्ताव सादर केला होता. या प्रस्तावाची छाननी करून तो मंजूर करण्यात आला. यानंतर पोलिसांनी संबंधित आरोपीस आदेशाची बजावणी करून दि. ९ एप्रिल २०२६ रोजी त्याला जिल्ह्याबाहेर पाठवले.

# कोकणगावात स्ट्रीट लाईटचे ७ पोल व हायमॅक्स दिवे चोरी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**आश्वी** : संगमनेर तालुक्यातील कोकणगाव येथील ‘खालचा मळा’ परिसरातून सार्वजनिक सुविधेसाठी बसवण्यात आलेले स्ट्रीट लाईटचे सात पोल आणि हायमॅक्स दिवे अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे.

या प्रकारामुळे परिसरात खळबळ उडाली असून ग्रामपंचायतीच्या मालमत्तेच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कोकणगाव–मनोली रोडवरील वस्तीवर १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतून पथदिवे बसवण्यात आले होते. मात्र, रात्रीच्या सुमारास अज्ञात व्यक्तींनी येथील सात पोल व सात हायमॅक्स दिवे चोरी करून नेले.

सकाळी ही बाब उघडकीस आल्यानंतर ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. यासंदर्भात स्थानिक नागरिक हौशीराम माधव जोंधळे यांनी प्रशासनाकडे निवेदन देत चोरीला गेलेले साहित्य तात्काळ परत बसवावे व संबंधित दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, सरकारी मालमत्ता सुरक्षित राहणार का, असा सवाल उपस्थित केला जात आहे. दरम्यान, प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल न घेतल्यास कोल्हार–घोटी राज्य महामार्गावर रस्ता रोको आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

या निवेदनाच्या प्रती कोकणगाव शिवापूर ग्रामपंचायत, संगमनेर तालुका पोलीस ठाणे, पंचायत समिती तसेच संबंधित लोकप्रतिनिधींना देण्यात आल्या आहेत. या प्रकरणात सुमारे ४० ते ४५ ग्रामस्थांच्या सह्या असून, लवकरात लवकर कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन उभारण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# औषध फवारणी करणाऱ्या कंत्राटी कामगाराला मारहाण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : श्रीरामपूर शहरातील वॉर्ड नं. २ मध्ये औषध फवारणीसाठी गेलेल्या कंत्राटी कामगाराला गचांडून मारहाण करण्यात आली आहे. वॉर्ड न. २ मध्ये १५ दिवसातील हा दुसरा प्रकार आहे. प्रकार काल दुपारी घडला. १५ दिवसातील हा दुसरा प्रकार आहे. राहुल चव्हाण हा एव्हरग्रिन पेस्ट कंट्रोल या कंपनीकडे औषध फवारणीचे काम करतो. त्या कंपनीस श्रीरामपूर नगरपालिकेने शहरात औषध फवारण्याचा ठेका दिला असून पालिका जेथे सांगेल तेथे शहरात औषध फवारणीचे काम ते करत असतात. ८ एप्रिल रोजी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास राहुल चव्हाण व त्याच्यासोबत काम करणारे ट्रॅक्टर ड्रायव्हर सोहन राजू मोरे, आकाश नारायण भुसे असे यांना नेमून दिलेल्या ठिकाणी वॉर्ड नं. २ मध्ये ट्रॅक्टरद्वारे फवारणी करत असताना वारे सुटल्याने काही द्रव मेहमूद पटेल यांच्या घरात गेल्याच्या कारणावरून ते शिव्या देत घराबाहेर आले. तेव्हा पण वाऱ्यामुळे चुकून द्रव तुमच्या घरात आला असावा असे म्हणत आपण त्यांची माफी मागितली. मात्र, त्यावर मेहमूद पटेल हा धावत अंगावर आला व राहुल चव्हाण याची गचांडी धरून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यावेळी एका अनोळखी इसमाने राहुल चव्हाण या मागून धरले. त्यानंतर पटेल याने जवळ पडलेली काठी घेवून त्याच्या पाठीवर, हातावर मारली. राहूकबरोबर असलेला आकाश भुसे हा त्यांना समजून सांगत असताना त्या दोघांनी आकाश यालाही वाईट वाईट शिवीगाळ करून धक्काबुक्की केली. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात राहुल सखाराम चव्हाण याने फिर्याद दाखल केली असून पोलिसांनी मेहमूद पटेल (पुर्ण नाव माहीत नाही), रा. वॉर्ड नं. २ व एक अनोळखी इसम यांच्याविरूद्ध श्रीरामपूर शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक. नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीरामपूर शहर पोलीस करीत आहेत.

# रयत शैक्षणिक संकुलात १८ तासांचा वाचन उपक्रम

## विद्यार्थ्यांना सहभागाचे आवाहन



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : रयत शैक्षणिक संकुल, श्रीरामपूरच्या वतीने ग्रंथालय व रयत स्पर्धा परीक्षा कॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने सलग १८ तासांचा वाचन उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. महात्मा ज्योतिराव फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. मीनाताई जगधने यांच्या संकल्पनेतून आयोजित या उपक्रमाचा प्रारंभ १० एप्रिल २०२६ रोजी सकाळी ६ वाजता होऊन रात्री १२ वाजेपर्यंत सुरू राहणार आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सातत्यपूर्ण अभ्यासाची सवय, एकाग्रता आणि वेळेचे व्यवस्थापन विकसित होण्यास मदत होणार आहे.

उपक्रमासाठी विद्यार्थ्यांची नोंदणी चंद्ररूप डाकले जैन कॉलेज ऑफ कॉमर्स येथे सुरू असून, श्रीरामपूर व परिसरातील विद्यार्थी, वाचक व ग्रंथप्रेमींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. संजय कांबळे यांनी केले आहे. या दरम्यान विद्यार्थ्यांसाठी पिण्याचे पाणी, चहा व विश्रांतीची सोय करण्यात येणार असून वाचन कक्षात शांत व अभ्यासपूर्ण वातावरण राखले जाणार आहे. यासोबतच संविधान उद्देशिकेचे वितरण, सामाजिक समतेवर कार्यशाळा, निबंध स्पर्धा, पुस्तक प्रदर्शन व प्रा. सुभाष वाघमारे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. मुकुंद पोंधे, डॉ. प्रवीण बडधे व अन्य मान्यवरांनी केले आहे.

# स्विप्ट वाहनाच्या धडकेने दुचाकीस्वाराचा मृत्यू



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जामखेड** : तालुक्यातील झिक्री या ठिकाणी स्विप्ट कार व दुचाकीचा आपघात होऊन दुचाकी स्वराचा जाग्यावरच मृत्यू झाला. या प्रकरणी जामखेड पोलीस स्टेशनला अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की गुरुवार दि ९ एप्रिल २०२६ रोजी दुपारी तीन वाजता दुचाकीस्वार हा जामखेड कडुन नान्नज या ठीकाणी चालला असता त्याची दुचाकी झीक्री येथील मंगल कार्यालया समोर आली याच दरम्यान स्विप्ट कार व दुचाकी वाहनाचा अपघात झाला. या आपघातात रामा बाबुजी भिसे, वय ३९ रा. टाकळसिंग, ता. आष्टी जि.बीड याचा जाग्यावरच मृत्यू झाला. दुचाकीस्वार हा जामखेड कडुन नान्नज या ठीकाणी चालला असता. आपघात झाल्या नंतर स्विप्टचा कार चालक हा घटस्थळाहुन फरार झाला. आपघाताची माहिती समजताच सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांनी घटनास्थळी धाव घेतली व आपल्या रुग्णवाहिकेतुन गंभीर जखमी असलेल्या भिसे यास ग्रामिण रुग्णालयात दाखल केले. जामखेड येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. कुंडलिक अवसरे यांनी तरुणास मृत घोषित केले. मयत भिसे हा नान्नज येथील एका हॉटेल मध्ये वेटरचे काम करित होता. सध्या या प्रकरणी जामखेड पोलीस स्टेशनला अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास जामखेड पोलीस करत आहेत.

# श्रीरामपूर बसस्थानकास अद्ययावत बसेस मिळणार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : येथील राज्य महामंडळाचे बसस्थानकास नवीन अद्ययावत १५ बसेस उपलब्ध करण्याचे मुल्यांकन समितीच्या अधिकार्यांनी मान्य केले असून नवीन बसेस बांधणीचे काम ज्या कंपनीला देण्याचे धोरण आहे. त्यामध्ये आगामी काळात १५ बसेस असे ३० बसेस उपलब्ध होणार असल्याची माहिती सदस्य रणजीत श्रीगोड यांनी दिली. राज्य महामंडळाचे स्थापन केलेल्या स्व. बाळासाहेब ठाकरे स्वच्छता अभियानांतर्गत मुल्यांकन समितीने येथील डेपोला भेट देवून चौथ्यांदा सर्वेक्षण केले.

मुंबई येथील मुल्यांकन समितीचे सदस्य असलेले प्रादेशिक अभियंता विवेक लोंढे, वरीष्ठ सांखिक संतोष शेगोकार, यंत्र अभियंता सचिन चाचरे, रणजीत श्रीगोड आदी मुल्यांकन सर्वेक्षण प्रसंगी उपस्थित




होते. सर्वेक्षण अहवालानुसार गुण देण्यात आले. अहिल्यानगर जिल्ह्यातील अ वर्ग असलेल्या बस स्थानकाचे सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षण समितीच्या अधिकार्यांचे प्रवासी संघाच्या वतीने उपाध्याय डॉ. गोरख बारहाते, दत्तात्रय काशिद, किशोर फुणगे यांनी स्वागत केले. यावेळी नवीन बस स्थानकांचे यापर्वी बस स्थानकाचे प्लॅन नकाशे तयार करण्यात आले.

त्यामध्ये बारामती बस स्थानकाप्रमाणे ४ जादा नवीन सुविधा निर्माण करण्याची सूचना करून सध्या ज्या नवीन पद्धतीच्या बांधणी केलेल्या बसेस येत आहे. त्यामधील १५ नवीन बस देण्याची मागणी करण्यात आली. ही मागणी मान्य करण्यात आली. नवीन बसेस बांधणीचे काम ज्या कंपनीला देण्याचे धोरण आहे. त्यामध्ये आगामी काळात १५ बसेस असे ३० बसेस उपलब्ध होणार आहे. सकारात्मक भूमिका घेवून ग्रामीण भागातील प्रवाशांना आरामदायी प्रवास होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. इलेक्ट्रॉनिक बसेस करीता चार्जींग व्यवस्थाही मंजूरी करण्यात आली.

लांब मार्गावर धावणार्या बसेस उपलब्ध होतील. अहिल्यानगर एसटी विभागाचे विभाग नियंत्रक राजेंद्र जगताप यांचे येथील बस डेपो विकासासाठी विशेष लक्ष असल्याबद्दल समाधान व्यक्त करण्यात आले. डेपो व्यवस्थापक अनिल बेहरे व राकेश सोनवणे यांनी डेपोच्या वतीने मुल्यांकन समितीच्या सदस्यांचा सत्कार केला. नवीन बसस्थानकास गती देण्याचे लक्ष वेधले

# ना हरकत प्रमाणपत्र नाकारल्याचा राग

## आरटीओतील वरिष्ठ लिपीकास मारहाण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : येथील उपप्रादेशिक परिवहन (आरटीओ) कार्यालयात काम करत असताना वरिष्ठ लिपिकाने ना हरकत प्रमाणपत्र दिले नाही म्हणून त्यास दोन जणांनी मारहाण करून सरकारी कामात अडथळा निर्माण केला.

याप्रकरणी शहर पोलिस ठाण्यात दोघांविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुधाकर संपत साळवे हे आरटीओ कार्यालयात वरिष्ठ लिपिक म्हणून कार्यरत आहेत. काल सकाळी ११ वाजेच्या सुमारास आरटीओ एजंट सुरेश ऊर्फ शाम गवारे (रा. शिरसगाव) व सुजित गायकवाड (रा. सरस्वती कॉलनी, श्रीरामपूर) यांनी विनाकारण अरेरावीची भाषा करत वाद घातला.

दुपारी साडेचारच्या सुमारास गवारे पुन्हा कार्यालयात येऊन एका चारचाकी वाहनावर एलपीजी गॅस किट बसवण्यासाठी ना हरकत सही करण्याचा दबाव टाकू लागला. मात्र संबंधित वाहनावर फायनान्सचा बोजा असल्याने आवश्यक ना हरकत प्रमाणपत्र आणण्याची नोंद साळवे यांनी केली.

यामुळे संतप्त झालेल्या गवारे याने शिवीगाळ करत साळवे यांची गच्ची धरून कानाखाली मारहाण केली. तसेच संगणकाचा कीबोर्ड हिसकावण्याचा प्रयत्न करून सरकारी कामात अडथळा आणला. यानंतर साळवे हे वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार करण्यासाठी जात असताना गायकवाड यानेही त्यांना अडवून शिवीगाळ करत मारहाण केली.

कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी मध्यस्थी करून साळवे यांची सुटका केली. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात आरटीओ कार्यालयात वरिष्ठ लिपिक सुधाकर संपत साळवे यांनी फिर्याद दाखल केली असून पोलिसांनी सुरेश ऊर्फ शाम गवारे व सुजित गायकवाड या दोघांविरुद्ध मारहाण, दमदाटी व सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.